# उल्हासिका




१९५३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२२०
REFBK-0008081
REFBK-0008081


उल्हास

# अुल्हासिका

## ( काव्यसङ्ग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ..........

★

REFBK-0008081
REFBK-0008081

—कवि—

अुल्हास

( नारायण सदाशिव बापट )

प्रस्तावनाः—प्रा. चन्द्रकुमार डाङ्गे
M. A; M. Ed.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 6069

जानेवारी १९५३

मुद्रक–: चिन्तामण पाण्डुरङ्ग मोडक. समन्वय प्रिण्टर्स
१९६/६९ टिळक रोड, पुणें २.
प्रकाशकः–सौ. अिन्दुमती नारायण बापट
७५९/६१ कर्वे रोड, पुणें ४.

दा. क्र. ८०८...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

सं. क्र. ३१०५
9220
स्थळ प्रत

# प्रस्तावना

१९५२ सालच्या वेळापत्रकाप्रमाणें मी वर्गांत गेलों आणि व्याख्यानाचा आरंभ करीतच सर्वत्र नजर टाकली. अगदीं एका टोंकाला, शेवटल्या ओळींत एका बाकावर आपले दोन्ही हाताचे तळवे चेहराभर पसरून डोळे स्थिर करून, आडव्या बांध्याच्या भरीवपणाची जाणीव सह-अध्यापकांना देत बसलेल्या एका व्यक्तीनं माझं चित्त वेधलं. केवळ स्मित हास्यानंच आम्ही एकमेकांना 'ओळखून' असल्याची जाणीव स्पष्ट केली. पण माझ्या मनांत मात्र चलबिचल झाली. आपलं व्याख्यान आतां प्रश्न आणि उपप्रश्न यांनी 'रंगणार' असा विचार प्रबळ होत गेला. पण तसं कांहीं घडलं नाहीं. पुन्हां एकदां मी प्लॅटफॉर्मवरून उतरतांना त्या व्यक्तीकडे पाहिलं. 'हें कसं असं घडलं' असाच अर्थ आम्ही व्यक्त केला. आणि कांहीं वेळानं माझ्या पाठीवर 'स्कॉटलंड यार्ड' पद्धतीनें एक बोट कुणीतरी टेकविलं म्हणून मी वळून पहातो तों 'सर, माझं जरा काम आहे तुमच्याशीं' असें थोडेसें औपचारिक बोलतच ती व्यक्ति जरा दूर गेल्यावर उद्गारली 'अरे, तूं इथें असतोस ?' मी तोच प्रतिप्रश्न करीत म्हटलें, 'पण आज तूं कही शंका कशी विचारली नाहींस ?' त्यावर आम्ही दोघंही मनःपूर्वक सलों. कारण 'शंका' बापट बी. टी. ला आला होता !

इतकंच नव्हे तर एक दिवस अचानक माझ्या हातीं एका मोठ्या किटांत आपल्या निवडक कविता घालून, मला तें पाकीट देतांना श्री. बापट ाले 'हा माझा काव्यसंग्रह आहे. लवकरच तो प्रकाशित होणार आहे,' मी कांही बोलणार तोंच श्री. बापट दूर निघून चालायला देखील लागले ! त्यावरून मला एका प्रसंगाची आठवण झाली. कांहीं वर्षांपूर्वी एक छोटी पुस्तिका माझ्या हातीं देत त्यांनीं म्हटलेलें आठवलं, 'हा माझा थिसिस् आहे. वाचून मत कळव.' आणि त्या निबंधाची (मानवी जीवन आणि बुद्धिवाद) र्वत्र झालेली प्रशंसा मला स्पष्ट आठवूं लागली. आणि याहीपेक्षां मोठा

धक्का त्यांनीं मला कांहीं हस्तलिखितें दाखवून, त्यावरच्या तांबडया रेघांवरून बोटें फिरवीत काढलेल्या शब्दांनीं दिला. “ हया खुणा कोणी केल्यात आहे ठाऊक ? तात्यासाहेब केळकरच प्रस्तावना लिहिणार होते ! ” खरोखर मी सर्द झालों. पुण्यांत कित्येक व्याख्यात्यांना ‘ शंका ’ विचारून आमच्या ‘टोळीनें’ इतकें हतबुद्ध कधींच केलं नसेल. त्या आमच्या नायकानं आपल्याच एका साथीदारावर असा उघड, उजेडांत घाव घालावा हें किती विस्मयजनक! वसंत व्याख्यान मालेचा जर कधीं खराखुरा इतिहास लिहिला गेला तर श्री. बापट आणि माझ्यासारखे त्यांचे साथीदार यांचा उल्लेख अवश्य करावा लागेल. कारण आम्ही ‘प्रश्न’ विचारायच्या निर्धारानें प्रत्येक व्याख्यान ऐकत असूं. कुणी काय विचारायचं हें अगदीं ठरलेलें असे. आणि कुणाला कांहींच सुचलें नाहीं तर बापट आपला तयार !

प्रत्यक्ष छापील मुद्रितें वाचण्यापूर्वीं माझं मन उल्हासची कविता कोणत्या स्वरूपाची असेल या कल्पनेशीं चाळा करूं लागलं आणि मी एका कल्पनेनं अक्षरशः हादरून गेलों! ‘ हें नवकाव्य तर नसेल ? ’ हा प्रश्न माझ्या डोक्यांत गरगरूं लागला. कारण नवकाव्यावर लिहायचं म्हणजे त्याला ‘भयंकर प्रकृतीचीच’ गरज आहे अशी माझी उपलब्ध नवकाव्य वाचून आणि त्याला ‘शिवलेल्या’ ‘व्यवच्छेदक लक्षणांच्या’ प्रस्तावना वाचून खात्री झाली होती. नवकाव्याच्या ‘ साथीला ’ आपला एक मित्र बळी पडला कीं काय अशीही दुष्ट शंका आलीच. कारण आजकालची ‘फॅशन’ नवकाव्य लिहिण्याची आहे. तरी सुदैवानें एक गोष्ट मोठी आशादायक आहे कीं, ‘तें नवकाव्य’ फक्त त्या नवकवींनाच कळतें ! इतर काव्याचे रसिक ‘त्यांना’ ‘अस्पृश्य’ वाटतात. तशांत नवकाव्याची तरफदारी करणारीं ‘भोळीं’ साप्ताहिकें आणि मासिकें या साऱ्यांना ही ‘ लीलाममे लाया चीज ’ अभिनव आणि ‘क्रांतिकारक’ वाटत असल्यामुळें आपला उल्हास या ‘फाल्गुनी वाङमयाच्या होळीवरचा होळकर बनला ’ कीं काय अशींही धास्ती उत्पन्न झाली. पण या भयानक विचारांच्या आवर्तनांत एक आशेचा किरण होता. तो म्हणजे सत्यकथेंत पूर्वीं वाचलेली उल्हासची ‘निरोपाच्या नजरेंत’ ही कविता होय. देवीवर छंदांतल्या त्या सफाईदार रचलेल्या पंक्ती पुनः जाग्या झाल्या. उल्हास हें नांव सार्थ करणारी ती श्री. बापटांची एक सुन्दर कविता आहे.

‘ निरोपाच्या नजरेंत  शीतलशा दोन ज्योती
दूर जातां प्रियकरा  पाठवणी ओंवाळीती

किंवा

‘ निरोपाच्या नजरेंत  अशी करूं देवघेव
आणि स्मृतीवर तिच्या  मग रमवूं ये जीव ’

यासारख्या आशादायक वृत्तीनं लिहिलेलं उल्हासचं काव्य असेल तर किती बरं होईल, अशी आशाही वाटूं लागली. आणि या छोटया उल्हासिकेंत समाविष्ट केलेल्या ४१ कविता वाचून ती आशा शतगुणित झाली ! आपल्या एका समवयस्क कवीचा संयम, वैचारिक निष्ठा आणि रसरसलेला आशावाद या गुणांनीं नटलेला काव्यसंग्रह रसिकांच्या पुढें मोठ्या शालीनतेनें येत आहे या विचारानं मन उल्हसित झालं !

पण ही उल्हासिका उजळत आहे ती किती प्रतिकूल वातावरणांत ! पण म्हणूनच ती एका अर्थानं वैशिष्टचपूर्ण आहे. सुमारें दहा वर्षांपूर्वी ‘ मराठी काव्याला ओहोटी लागली आहे ’ अशी ‘ पुरोगामी आंवई ’ कोणी तरी पिकवली. आणि या अफवेचा पुरा सूड जर कोणी घेतला असेल तर तो नवकवींनीं, म्हणजे त्यांच्या नव-काव्यानं ! पण येथपर्यंतच थांबलें नाहीं तर ‘ जुन्या ’ कवींना व्यासपीठावरून दगड मारण्याचा उपक्रमही जोरांत सुरू झाला. कुठल्या तरी पस्तीशीच्या बाईनं उठावं आणि आपली जुनी जर ‘ शेला-पैठणीच्या ’ दिमाखानं चवाठ्यावर विकतांना खुशाल दगडफेंक करावी ! तर साहेबाच्या खांद्यावर बसून टीकाप्रकार सांगणाऱ्या एखाद्या बहाद्दरानं आंकडेवारीच्या आणि पोकळ अनुमानांच्या आधारावर माननीय कवींना खुशाल ‘ पलायनवादी ’ म्हणून शिक्के मारीत सुटावं. ‘ मानवता, ’ ‘अश्रू’, ‘क्रांति, ‘रक्त’ असल्या स्वस्त शब्दांची खैरात करून कुणाला ‘उद्यांचा’ तर कुणाला ‘परवाचा’ कवि ठरवावं. तर एखाद्या कालच्या पोरानं, चार अक्षरं जुळविण्याच्या संवयीवर ज्ञानदेवांना ‘ टिप्पणी कां लिहिल्या नाहींत ? ’ असा प्रश्न विचारून ‘इनोद’ साधावा ! असा आजचा जमाना आहे. वैयक्तिक बेताल अशा जीवनाच्या नरकांत रममाण होत असतांना जगाला मात्र ‘ आर्थिक समतेचा ’ आणि ‘ क्रांतीचा ’ संदेश सांगणारे ‘ भुणभुणे, ’ ‘ कई ’ म्हणून नुसते मिरवीत नाहींत तर त्यांच्या ‘ मेणाच्या ताटल्या ’

ज्या संख्येनं विकतात त्यावरच काव्याचं श्रेष्ठत्व आणि कवीचं व्यक्तित्व मापलं जाऊं लागलं आहे. केशवसुत, गडकरी, बालकवि, कुसुमाग्रज, यशवंत तांबे, गिरीश, माधव, यांच्या संपूर्ण कविता न वाचतां देखील त्यांना 'खलास' म्हणून डावलण्याचा आजचा काळ आहे. आपल्या वैयक्तिक चाळयांचे चोजले पुरवीत, कळप करून राहणाऱ्या तथाकथित 'कवींचा' हा काळ आहे. त्याच्या जोडीला सर्वत्र भरून येत असलेली 'विफलतेची' भयानक जाणीव ! याची कल्पना उल्हासला नाहीं असं नाहीं. तो म्हणतो,

**'नित पैंजण येथें लक्ष्मीचा खुळखुळे**
**माणुसकी विकिली वाराङ्गण मोकळें**
**चुरडिती पदतलीं शिवसत्याचे कळे**
**--मी जातों अिथुनी; जग माझें वेगळें'**

पण म्हणून या कठोर वस्तुस्थितीपासून उल्हास दूर गेला नाहीं. तर एक अत्यंत वास्तव असा आशावाद उराशीं घट्ट धरून तो झगडत राहिला.

**'मी दमल्यावरि मज उचलिल मृत्यूसखा**
**विस्मृतींत फुङकिल काळही माझी रखा**
**जन्मेन कदाचित पुनः मानवांतुनी**
**नवरूपी अुत्स्फूर्ताच्या कृत्यांतुनी'**

उल्हासची 'उल्हासिका' वैशिष्टपूर्ण आहे असं मी म्हणतों तें यासाठींच.

अर्थातच् जगापुढं आपला काव्यसंभार आणतांना उल्हासनं रसिक-वृत्तीला आवाहन केलेलं असलं तर नवल नाहीं. पण तिथेंही एक प्रकारचा पीळ आहे. **'कोठेंही जगतांत या रसिकते ना भासतें अंतर'** असा विश्वास प्रकट करून कवि म्हणतो,

**'कृतींना माझिया ठेवा कितीही दूषणें तुम्ही**
**तयां राहीन मानोनी दिलेली भूषणें नामी'**

हा पीळ, 'जिद्द' किंवा आत्मविश्वास केवळ स्वतःच्या काव्यापुरताच मर्यादित नाहीं; तर त्याचें प्रतिबिंबच कवितारूपानें अभिव्यक्त झालेलें आहे. 'शिववंश' (आगामी महाकाव्य), 'हे सह्याद्रि,' 'किल्यांत कशाला जाऊं ?' किंवा 'स्वातंत्र्यलक्ष्मीस' या ऐतिहासिक विषयांवर रचलेल्या आणि कवीचें स्फटिकवत् भावनाप्रधान अंतःकरण उघड करून दाखविणाऱ्या

कविता कशाच्या निदर्शक आहेत? पाश्चात्य आणि पौर्वात्य राजकीय आणि तत्त्वज्ञानात्मक वाङ्मय आकंठ वाचून आणि प्रत्यक्ष राजकीय आखाड्यांत चार हात करूनही श्री. बापट यांच्या व्यक्तिमत्त्वांतील ही सुषमा कशी विलसत राहिली याची संगति जर लावावयाची म्हटली तर त्याला एकच कारण निर्देशित करावं लागेल. आणि तें म्हणजे स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरांच्या विशाल व्यक्तित्वाच्या छायेंत वाढलेला कवि उल्हास ! स्वतःला बुद्धिवादी मानणाऱ्या बापटांनीं, तथाकथित बुद्धिवाद्याचीं 'अश्रद्ध' वृत्ति स्वतःला चिकटवून घेतली नाहींच; पण आपल्या अंतःकरणांतील **'नित परीक्षावया निजहृदिंचीं स्पन्दनें'** अशी एक प्रकारची तेजस्वी वृत्ति जागती ठेवली. ही 'अलिप्तता' केवळ 'वाङ्मयीन' नाहीं; तर तिला जीवनधर्माचा भरभक्कम पाया आहे.

उल्हासच्या सर्व कवितांना संयमाचा आणि प्रामाणिक वृत्तीचा मनोहर परिसर लाभलेला आहे. उल्हासिकेंत मला जो जिवंतपणा वाटतो तो याभुळंच. मराठी वाङ्मयांतील मूलग्राही टीकाकार प्रा. श्री. के. क्षीर-सागर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काव्याचं मर्म विशद करीत असतांना जें म्हटलं आहे तीच 'प्रवृत्तीपर वृत्ति' (Love of Life) आणि 'सौन्दर्यवादी वृत्ति' उल्हासची पाठीराखी बनून राहिली आहे. इतकंच नव्हे तर, **'साधोनी पुरुषार्थ सर्व अुरसी मोक्षासि आकर्षण'** या पंक्तींनं आपल्या मनांतील भक्तिभाव, स्वातंत्र्यवीरांबद्दल गौरवोद्गार काढतांना त्यानं व्यक्त केला आहे. जीवनांत जें जें भव्य, उदात्त, मंगल आणि क्रान्ति-कारक आहे त्याची मानसपूजा करावयाचा मोह उल्हासला न झाला तरच आश्चर्य ! म्हणूनच सुभाषचंद्राला पाहून तो विनीत होतो आणि सह्याद्रीचं दर्शन घडल्यावर सहज गुणगुणतो,

**'दुबळ्यांचा हा तुला समर्था, प्रणामकर जाण**
**दिलेला पहिला घे मान;**
**पायथ्यावरी विनम्रतेनें भाट उभा दीन**
**भक्तिनें लवलेली मान**

सह्याद्रीवरचे किल्ले त्याला कसे भासतात,

**'शिपाया, शौर्याचे बिल्ले !'**

पण तत्क्षणीं आपल्या मनांतील हळहळ त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. ह्या किल्ल्यावर पाऊल टाकतांना उल्हास विचलित होऊन म्हणतो,

**'हें काळें तोंड गुलामी दाखवूं कसें हो त्यातें ?'**

आज सुदैवानें भारत स्वतंत्र झाला आहे. पण अजूनही त्या स्वातंत्र्याला आपली प्रभा प्रकट करण्याच्या मार्गांत कितीतरी भयानक संकटांना तोंड द्यावं लागत आहे. अज्ञान, निरक्षरता, जातिद्वेष, वैर, स्वार्थ, सत्तान्धता, रूढी, विषमता इत्यादी हजारों काळेकुट्ट ढग त्या स्वातंत्र्य-लक्ष्मीच्या तेजाला ग्रहणच लावीत नाहींत काय? तोपर्यंत उल्हासनं लिहिलेल्या पुढील ओळीं अजूनही एका अर्थानं किती यथार्थ वाटतील.

**'परि जाऊनियां नुसतेंच**
**आठवोनि झालें तेंच**
**जो शिळालेख तो तोच**
**एकसारखा वाचुनियां काळ कां दवडिणें वायां ?'**

भारताला या नवविश्वांत स्वस्थ बसून कसें चालेल? या नव्या युगाची जाणीव अधिक तीव्र वाटूनच कीं काय उल्हास 'आव्हान' देतो.

**'वाफेस कुणीही अडवूं नका !**
**हा खटाटोप जाईल फुका'**

कारण— **भव्य कार्य जरि भव्य न मूर्ति**
**करील अपुरी इच्छापूर्ति**
**'ही वाफेची दिगंत कीर्ति**
**हव्यास खलांनो कां इतुका ?'**

या ओळी म्हणजे नवसमाज-रचनेच्या लागलेल्या वेदनाच होत. तिथें शब्दप्रामाण्य किंवा पोथीबंदपणा यांना जसा वाव नाहीं तद्वतच व्यक्तिमाहात्म्याचे देव्हारेही नाहींत. या जागृत वृत्तीनं उल्हासनं कविता लिहिली आणि श्री. नारायण बापट यांनी बॅ. सावरकरांच्या राजकीय मतप्रणालीवर कडाडून हल्ला केला ! हें व्यक्तित्वांतील द्वैत नव्हे तर बुद्धि आणि प्रतिभा यांची क्षेत्रं साधणारं अद्वैत होय. जिथं जिथं हौतात्म्य दिसलं तिथं त्या सांडलेल्या रक्तबिंदूंना पाहून उल्हासला वाटलं,

**जेव्हां हे गळतात बिन्दु भुवनीं तो काळ होई सण !**

सं. क्र. ३।०५५-९२२

पण जिथं निष्पाप रक्ताचे सडे सांडले, भयानक अत्याचार झाले, क्रूर लुटालूट झाली त्या प्रसंगानं उल्हासनं दिलेला इषारा आजही सतत डोळ्यापुढं ठेवण्यासारखाच आहे.

'सत्य तुम्हा देतसे इषारा
पापकाल हा ठाकला पुरा
कसा कंबरा सज्ज व्हा त्वरा
वारिण्या परिस्थिति भयंकरा'

नों. क्र. ९७९२४.
२२२५/३

१५ ऑगस्ट १९४७ सालीं लिहिलेल्या या ओळी जरी प्रसंगोद्भव असल्या तरी त्यांचं आवाहन किती दूरगामी आणि विशाल आहे ! पण या परिस्थितीवर मात करण्यासाठीं उल्हासनं एक 'आवाहन' केलं आहे.

' पञ्चखण्डिं पसरे मानवता
उत्कर्ष तिचा उज्ज्वल कविता
ठरेल मानववंशि संहिता
संजीवनी युगांयुगांतुनी '

प्रतिभेचं आणि पर्यायानं कवीचं असामान्य स्थान सूचित करणारी ही कविता म्हणजे कवीच्या प्रखर आशावादाचा पुरावाच नव्हे काय ?

उल्हासची प्रीतिविषयक कविता अशाच एका निष्ठेनं पुनीत झालेली आहे, ' भाविनीस ' तो काय म्हणतो पहा.

' पापांपासूनी रक्षकांसम मला राखावया चाहुल
येओ नित्य तुझी पडेल मग कां हें वाकडें पाउल ? '

उत्कृष्ट आणि प्रामाणिक प्रीतीची साक्ष देणाऱ्या ह्या ओळी आजच्या भ्रमरवृत्तीनं पिसाटलेल्या तरुण पिढीला स्तिमित करतील. प्रीतीनं उल्हास क्वचित् व्याकुळ होतो पण तो ' पलायनवादी ' बनून गूढगुंजनाच्या आड लपत नाहीं.

' निद्रिस्त बालकास ' ' किंवा डोळे वटारू नका ! ' यांसारख्या कविता उल्हासच्या मनाचा एक नवा पैलूच दाखवितात. तर अन्योक्तींचे प्रकार आणि आरंभींच्या कांहीं कविता नव्यानं काव्यसाधना करणाऱ्या त्याच्या परिश्रमाच्या आणि धडपडीच्या खुणा आहेत. आपल्या उत्साहाच्या भरांत तो एका संपादकाला केलेलीं काव्यबद्ध आर्जवें किंवा गद्यकाव्यें

देखील रसिकांच्या पुढं पसंतीसाठीं मांडतो. ही नवथरवृत्ति अपरिहार्य आहे. पण खरा उल्हास इथं नाहीं. त्याची सारी धडपड विश्वांत चाललेल्या घडपडींतून अक्षय टिकणाऱ्या मंगलाकडे आहे. महाराष्ट्रांतल्या प्रथितयश कर्त्या शब्दप्रभूंच्या छायोपछाया उल्हासिकेंत अगदीं सहज दिसतील; ह्या पुण्याईच्या आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या दिव्य प्रतिभेच्या आशीर्वादाच्या पुण्याईवर महाकाव्याचा संकल्प उल्हास अनुकूल परिस्थितींत पुरा करूं शकेल. पण एका तात्यांच्या अंगाखांद्यावर खेळलेली ही उल्हासिका दुसऱ्या तात्यांनीं आजच्या स्वरूपांत पाहिली असती तर आपल्या वाक्लेण्यांनीं तिला त्यांनीं किती नटवलं असलं, किती हर्षभरानं हंसविलं असतं !

उल्हास, खांडेकरी किंवा माडखोलकरी थाटानं मी तुझी कुणाशीं तुलना केली नाहीं कीं तुला 'व्हिट्मन्', 'स्कॉट' 'बायरन' किंवा आणखी कुणी तरी म्हटलं नाहीं. तद्वतच तुझ्या ४१ कवितांतील अलंकारांची आणि वृत्तछंदांची वर्गवारी करून पंडिती थाटानं 'रसचर्चाही' केली नाहीं. किंवा तूं 'उद्यांचा', कां 'परवांचा' कां 'तेरवांचा' कवि म्हणून ठरविण्याच्या फंदांतही पडलों नाहीं. आपण जें जीवन जगतो त्यांत कांहीं मूल्यें आहेत, निष्ठा आहेत, त्याला कांहीं सामाजिक जाणिवा आणि नेणिवा आहेत याची सतत जाणीव ठेवून तूं ही उल्हासिका रसिकांच्या पुढं आणलीस यांतच तुझं यश आहे. आणि माझी तरी अशी निष्ठा आहे कीं असं काव्य हें रसास्वादासाठीं असतं आणि तेंही 'स्वसंवेद्य' असं असतं. आजच्या तरुण पिढीला आणि उद्यांच्या श्रमिक जनतेला या उल्हासिकेंतून क्षणमात्र प्रकाश मिळाला तरी मी तुला धन्य समजेन. कारण तूं जें जगलास तें काव्यरूपानं प्रकट केलंस. आजच्या नकली नाण्यांच्या जगांत तुझी उल्हासिका निश्चयानं उजळत राहील. आणि कालौघांत तुझी प्रतिभा नव्या तेजानं नटून अनुभवाचे ऊनपाऊस खाऊन जेव्हां नवीं गाणीं लोकांच्यावर वर्षावूं लागेल तेव्हां माझ्यासारख्या तुझ्या स्नेह्याला किती आनंद होईल तें सांगायला हवं काय ?

**१-१-१९५३**
**टिळक कॉलेज,**
**पुणें २.**

**—चंद्रकुमार डांगे**

माझ्या जीवनांतील विश्रान्तिस्थानें आणि
स्फूर्तिस्थानें म्हणजे माझे थोर मित्र
श्री. बाळकृष्ण केशव आगाशे M. A.
( वाअी-पुणें-अलिबाग )
श्री. श्रीराम विठ्ठल हर्षे M. A.
( नेवरें-रत्नागिरी-मुम्बअी )
श्री. कल्याण शिवराम पाटील B. Sc. केमिस्ट्री
B. Sc. मायक्रोबायॉलॉजी
( पिङ्गुळी-कुडाळ-कराची-मुम्बअी )
श्री. रघुनाथ बळवन्त फणसाळकर M. A.
( विलेपारलें-मुम्बअी )

यांस ही अत्यल्प कृति
सप्रेम, सादर आणि कृतद्न्यतापूर्वक अर्पण केली आहे.

१९।१२।५२ —अुल्हास

कवि उल्हास (बापट) यांसी

आशीर्वाद सर्वदा —

संसारीचा आनंद । सेवावया स्वानंद ।
तोडण्याते भवबंध । साधन एक उल्हास ॥

दोघांसाठी उल्हास । दुःखांतरी त्याचा वास ।
सेवी जोडे इतरांस । उल्हास नित्य आचरणे ॥

ऐसा जीव बंधमुक्त । त्यासी सौख्यें सर्व प्राप्त ।
विश्वात्म्याचा तो चि भक्त । संत ज्ञानी उल्हासी ॥

दशाप्रयत्नाचे तरंग । उठती जाती जो निःसंग ।
तोची राही सदा दंग । आत्मानुभवी उल्हासी ॥

॥

13.3.37. — ऋग्वेदी

शु. १ फाल्गुन शाके १८५८.

अृग्वेदी म्हणजे कै० वामन मङ्गेश दुभाषी ( कारवार-विलेपारलें-मुम्बआी
यांचा परिचय त्यांचे नातू मित्रवर्य पु. ल. देशपांडे यांनीं महाराष्ट्रवाचकांस ' मौज
( मुम्बआी ) साप्ताहिकाच्या ५२ च्या खास दिवाळी अङ्कांत करून दिला आहेच

—ना. स. बापट

अुल्हास



जन्म ता. १०–११–१७

# परिचय

**अुल्हास (नारायण सदाशिव बापट)**. व्यवसाय–लेखन, अध्यापन व प्रचार. अिङ्ग्रजींत व मराठींत सामाजिक, राजकीय, तात्त्विक व संल्लग्न विषयांवर निबन्धरूपानें आणि नियतकालिकांतून लेखरूपानें लेखन करतात. लहानपणापासून कविता रचूं लागले त्यांतल्या कित्येक कविता महाराष्ट्रांतील प्रमुख नियतकालिकांतून विशेषत: मासिकांतून 'अुल्हास' या टोपण-नांवानें प्रसिद्ध झाल्या आहेत. 'मानवी जीवन आणि बुद्धिवाद', 'नीतिमीमांसा', 'Nationalism Versus Communalism', 'A plea for Regional Socialism' अित्यादि निबन्धांचे लेखक. यांनीं १९३९ पासून १९४५ पर्यन्त गुप्त राजकीय कार्याचा भाग म्हणून पुष्कळ लिखाण लिहून तें निरनिराळ्या डाव्या राजकीय गटांच्या सहकार्यानें प्रसृत केलें. 'चालू युद्ध आणि हिन्दी क्रान्ति', 'The Reactionary policy of the R. D. P. during the S. I. War', 'Our Task at present', 'What must we do now ?' या यांच्या गाजलेल्या गुप्त पुस्तिका होत. कांहीं वेळां यांनीं गुप्त वाङमय लिहितांना '**किसन बाल**' हें टोपणनांव घेतलें होतें. मुम्बअीहून 'क्रान्तियुद्ध' म्हणून गुप्त साप्ताहिक श्री. बापट व त्यांचे सहकारी काढीत त्यांतील ओळन्ओळ बहुधा त्यांनींच लिहिलेली असे. याखेरीज लहानमोठीं कित्येक गुप्त पत्रकें त्यांनीं लिहून प्रसृत केलीं होतीं. सध्यां ते राजकारणांतून निवृत्त आहेत. ते प्रभावी वक्ते म्हणून यशस्वी ठरलेले आहेत.

# भूमिका

प्रथमतः मी हें स्पष्ट करूं अिच्छितों कीं ज्यानें सङ्ख्येनें अधिक कविता रचिली आहे त्यालाच फक्त कवितासङ्ग्रह प्रसिद्ध करण्याचा अधिकार आहे असा जर कुणाचा सङ्केत असेल तर तो मला मान्य नाहीं. कारण पुष्कळ कविता रचणाऱ्याच्या पुष्कळच कविता काव्यहीन असूं शकतात. अुलटपक्षीं अगदीं थोड्या, किम्बहुना अेकच कविता लिहूनही दीर्घकाल आठवले व आवडले जाणारे कवी आढळतात.

मानवी जीवनांत काव्यरचना किंवा काव्याभ्यास हा अितका अुच्च व्यासङ्ग आहे कीं त्याच्याहून अधिक महत्त्वाचें कधीं कांहींच नसतें असें मानणारा मी नाहीं. मानवी जीवनांत काव्याला अेक विशिष्ठ महत्त्वाचें मनोरम स्थान आहे अितकाच दावा कायतो मला समर्थनीय वाटतो. त्यामुळें काव्यरचनेहून अधिक महत्त्वाचीं शेंकडों कार्यें करणारे लक्षावधि मानव मला जगांत दिसतात.

या विश्वासामुळेंच 'अुल्हासिके'चें प्रकाशन अितका काळ लांबलें. यांतल्या बहुतेक कविता सुमारें अेक तपापूर्वींच रचलेल्या होत्या व त्यांतल्या कांहीं प्रसिद्धही झाल्या होत्या. थोड्या कविता अलिकडे रचल्या त्यासुद्धां या सङ्ग्रहांत घेतल्या आहेत. या विलंबाचें कारण हें कीं मी प्रौढ वयांत पदार्पण करण्याच्या सुरवातीसच

जगानें दुसऱ्या महायुद्धांत पदार्पण केलें.पांची खंडांतल्या व विशेषतः भारतांतल्या मानवबंधूंचीं दुःखें पाहून जें सामाजिक आणि राजकीय प्रचारात्मक वा अन्य प्रकारचें काम अधिक महत्त्वाचें वाटलें तें यथाशक्ति चांगल्या प्रकारें केलें. त्या दीर्घ धुमाळींत या कविता कुठच्या कुठे पडून होत्या. कराची (सिन्ध) च्या अल्प वास्तव्यांत पुस्तिकेचें हस्तलिखित लिहून तयार केलें होतें. पण मला सिन्धमधून यशस्वी (!) माघार घेऊन परत यावें लागलें.नंतर साहित्याचार्य कै.न.चिं.केळकरांनीं तें हस्तलिखित वाचलें.आवडलेल्या कवितांच्या शीर्षकांवर त्यांनीं ताम्बड्या पेन्सिलीनें खुणा केल्या त्या अजून आहेत.त्यांना छापून फायनल प्रुफें दाखविल्यावर ते प्रस्तावना लिहिणार होते पण हिंदुस्तानची फाळणी टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या खटपटी व्यक्तींपैकीं प्रत्येकाला जें करणें जरूर होतें त्यांत मी परत व्यग्र झाल्यामुळें परत तें प्रकाशन लाम्बणीवर पडलें. तूर्त श्रान्त झालेल्या वा जखमी झालेल्या शिपायाप्रमाणें जें जीवन काढणें भाग आहे त्या अवधींत या पुस्तिकेचें प्रकाशन अेक लहानसें वाङ्मयीन काम म्हणून हातीं घेतलें.

स्वतःच्या काव्याविषयीं कितीही यथायोग्य किंवा फाजील आत्मविश्वास असला तरी आपल्या कृतींचें कौतुक जर रसिकांनीं केलें तर मनाला हुरूप वाटतो. भवभूतीसारख्या महाभागाला 'अुत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा' या आशेवरच आरम्भीं रहावें लागलेसें दिसतें. तर मग माझ्यासारख्या अल्पसङ्ख्य ओळी लिहिणाऱ्याला, त्याच्या कवितांचें कौतुक कुणी अधिकारी पुरुषांनीं केलें असलें तर ती गोष्ट लपवून ठेवण्याचें शिष्ठ ढोङ्ग करण्याचें कारण नाहीं.

वीर विनायक दामोदर सावरकरांचा मी अनेक बाबतींत नितान्त ऋणी आहें. रत्नागिरीला त्या महाकवीच्या घनिष्ठ सहवासांत असतांना त्याचे किरण माझ्या मनाच्या कांचेवर पडले. कै. राम गणेश गडकरी व वीर वि. दा. सावरकर हे आधुनिक महाकवि आणि कविकुलगुरु कालिदास आणि शेक्स्पीयर अित्यादि महाभाग असलीं माझीं वाङमयीन दैवतें आहेत. केशवसुत, कै.ताम्बे, माधव ज्युलियन्, यशवन्त, शिरवाडकर, बोरकरप्रभृति लहानमोठे कवीही मला आवडतात. विद्यार्थी दशेंत ,तीर्थसरूप तात्याराव सावरकरांनीं मला गणवृत्तें व मात्रावृत्तें म्हणजे काय अशा विषयांपासून सत्काव्याच्या लक्षणांपर्यंत कितीतरी गोष्टी ओघाओघानें साङ्गितल्या–शिकविल्या. प्रसङ्गीं, "तुझे कवितां-खालीं टोपणनांव 'अुल्हास' असतें व शेजारीं 'रत्नागिरी' असेंही, देतोस, तेव्हां या कविता माझ्याच असेंच कांहींना वाटेल" असेंही 'नमनम्', 'स्वातन्त्र्यलक्ष्मी' प्रभृति कविता 'केसरी' अित्यादींत आल्या तेव्हां गुरुवर्य तात्यांनीं मनमोकळेपणानें म्हणावें. यामुळें मिळालेलें अुत्तेजन व झालेला गौरव याची कल्पना मलाच काय ती कदाचित् यथार्थ करतां येते. नंतर अन्धेरी (मुंबअी)च्या अिस्मा-अील कॉलेजांत असतांना माझे मित्र पुरुषोत्तम (आतां महाराष्ट्राचा लाडका झालेला अष्टपैलू कलाकार श्री. पु.ल.देशपांडे), गणपति रेगे (आतां दादरच्या सुप्रसिध्द बालविकासमंदिराचे मुख्याध्यापक व कार्यवान् शिक्षक श्री. गणपतराव रेगे) आणि माधव भागवत (आतां मुंबईचे यशस्वी व्यापारी श्री. मा. ल. भागवत) इत्यादिकांना माझ्या कविता आवडत. मध्यन्तरीं असली मण्डळी म्हणत, 'बापट, कविता करणें उगीच सोडलेंस'. त्याप्रमाणें गुरुवर्य प्रो. सदाशिव वा. पण्डित एम्.ए. (मुंबअी),त्यांचे बंधु तीं.नारायणराव पण्डित एम्.ए.,

एल.एल्.बी. (पुणें) इत्यादींना माझ्या कांहीं कविता आवडल्यानें त्यांच्याकडून अुत्तेजन मिळे. दे.भ.अच्युतराव पटवर्धनांनाही माझ्या कांहीं कविता आवडल्या होत्या. पुण्या-मुंबईचे सुप्रसिद्ध पत्रकार, बहुभाषाकोविद आणि वाङमयाचे व्यासङ्गी श्री. वि. गं. देशपांडे यांनीं तर एकदां एका नियतकालिकांत माझ्या एका कवितेचें रस-ग्रहण करण्यासाठीं अभिनव पद्धतीनें अेक लेख लिहिला होता. सारांश, माझ्या कवितांचें कौतुक नीट झालें आहे. इस्माईल कॉलेज, रामनारायण रुअिया कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, कांहीं समारंभस्थानें इत्यादि ठिकाणीं मी कविता यशस्वीपणानें म्हणून दाखविल्या आहेत. आतां प्रसिद्धीचा हव्यास तीव्रतेनें तरी राहिलेला नाहीं.चिपळूणचे प्रिय डाकवे बंधू, मध्यप्रांतांतले श्री. या.मु. पाठक (सं.-विहङ्गम) इत्यादिकांनीं आरम्भीं माझ्या कविता आपापल्या नियतकालिकांतून प्रसिद्ध केल्या त्या सर्वांचेच आभार मी येथें आज मानून घेतों.

थोड्या चांगल्या कवितांची भर मराठींत पडण्याचा सम्भव आहे या मर्यादशील आशेनें हा सङ्ग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यांतल्या अेकाद्यासुद्धां कवितेंतील अेकादी किरकोळ कल्पना जरी अगदीं दूरवरच्या अज्ञात ठिकाणच्या अेकाद्या अपरिचित रसिकाला हृद्य वाटली तरीसुध्दां या सङ्ग्रहाचें चीज होअील असें मला वाटतें. त्याचप्रमाणें काव्यवाचनाअितकींच किंवा अधिक महत्त्वाचीं कार्यें करणाऱ्यांनीं जर जाणतेअजाणतेपणानें माझ्या कवितांची अुपेक्षा केली तर त्यांच्याविषयीं मला खरोखरच अतिशय आदर वाटेल.

**नारायण सदाशिव बापट**
(अुल्हास)

ऑक्टोबर ५२ पुणें.

# अुल्हासिका

## अनुक्रमाणिका


| कवितेचा क्रमाङ्क | कवितेचें शीर्षक | प्रसिद्धिस्थान | पृष्ठाचा क्रमाङ्क |
|---|---|---|---|
| १ | नमनम् | केसरी (पुणें); Palms (अिस्माअील् कॉलेज नियतकालिक); रत्नागिरी हायस्कूल–नियतकालिक | १ |
| २ | रसिकसृष्टि | अप्रसिद्ध | २ |
| ३ | विहगास . . . | बलवन्त (रत्नागिरी), 'निर्झर' मासिक | ४ |
| ४ | नदीचा निर्धार ! | महाराष्ट्रशारदा (मुम्बअी) | ५ |
| ५ | फुलांत मधु कुठचा? | विहङ्गम (नागपुर) | ७ |
| ६ | अनन्य बहुरूपी | विविधज्ञानविस्तार (मुम्बअी) | ९ |
| ७ | सागरान्योक्ति | मनोहर (किर्लोस्करवाडी), रविवारचा सकाळ (पुणें) | १० |
| ८ | कमलान्योक्ति | मनोहर (किर्लोस्करवाडी) | १० |
| ९ | स्वातिजलान्योक्ति | मनोहर (किर्लोस्करवाडी) | १० |
| १० | आनन्द दे कुणाला? | विहङ्गम (नागपुर), वै. युवक (चिपळूण) | ११ |
| ११ | डोळे वटारूं नका! | स्त्री (किर्लोस्करवाडी), Palms (अिस्माअील कॉलेज् नियतकालिक), बलवन्त (रत्नागिरी) | १२ |
| १२ | येवढी दया कसाया दाव ! | वै. युवक (चिपळूण) | १४ |
| १३ | टाहो ! | वै. युवक (चिपळूण) | १५ |
| १४ | भाविनीस ... | वै. युवक (चिपळूण) | १६ |
| १५ | निळ्या निळ्या साडींतून ... | मनोहर (किर्लोस्करवाडी)–शीर्षक निराळें होतें. | १८ |
| १६ | ही व्यर्थ कशाला लाज गडे ? | बी. जे. मेडिकल स्कूल नियतकालिक (पुणें) | २० |
| १७ | निरोपाच्या नजरेंत | सत्यकथा (मुम्बअी), बलवन्त (रत्नागिरी) | २२ |
| १८ | साङ्गणें जाहला काय सख्या अपराध ? | विहङ्गम (नागपूर) | २४ |
| १९ | प्रीतीची व्याकुळता | अप्रसिद्ध | २५ |
| २० | हे सह्याद्रि ! | अप्रसिद्ध | २६ |
| २१ | अन्योक्ति | वै. युवक (चिपळूण) | २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | किल्ल्यांत कशाला जाऊं? | अप्‌रसिद्‌ध | २९ |
| २३ | स्वातन्त्र्यलक्ष्मीस... | केसरी (पुणें) | ३२ |
| २४ | आव्हान | कुठेतरी अेकदां प्रसिद्ध झाली असावी; निश्चित नोन्द नाहीं. | ३४ |
| २५ | सूडाचें गाणें | विहङ्गम (नागपूर)–शीर्षक निराळें होतें | ३६ |
| २६ | निन्दकांस... | बलवन्त (रत्नागिरी) | ३७ |
| २७ | निद्‌रे ! | अप्‌रसिद्‌ध | ३९ |
| २८ | एक अनुभव | अप्‌रसिद्‌ध | ४० |
| २९ | माझ्या एका सुखास | सत्यकथा (मुम्बई) | ४१ |
| ३० | देव तोच | अप्‌रसिद्‌ध | ४१ |
| ३१ | शिववंश (अपूर्ण सर्ग) | अप्‌रसिद्‌ध | ४२ |
| ३२ | द्न्यात्यांस | Palms (अिस्माअील कॉलेज–नियतकालिक) | ४४ |
| ३३ | निद्‌रित बालकास... | अप्‌रसिद्‌ध | ४६ |
| ३४ | हुतात्म्याचे रक्तन्बिदू | वै. युवक (चिपळूण), लोकमान्य (मुम्बअी) | ४९ |
| ३५ | सुभाषचन्द्‌रांस... | वै. युवक (चिपळूण), नवशक्ति (मुम्बअी) | ५० |
| ३६ | खण्डित हिन्दुस्तान! | अप्‌रसिद्‌ध | ५२ |
| ३७ | तुलाच... | सत्यकथा (मुम्बअी) | ५४ |
| ३८ | विनायक दामोदर सावरकर यांसीं... | वाङ्मयशोभा (पुणें) | ५५ |
| ३९ | आवाहन | अप्‌रसिद्‌ध | ५७ |
| ४० | घे रे बुध रसिका! | अप्‌रसिद्‌ध | ६० |
| ४१ | हें जीवन.... | अप्‌रसिद्‌ध | ६१ |


जाणीव (बी. जे. मेडिकल स्कूल नियतकालिक, पुणें), अभिमान तुझा... (अप्‌रसिद्‌ध), आअी (बालबोध, पुणें), आदर्श राजा शिव (केसरी, पुणें), धर्मवीर (शालापत्‌रक, पुणें), वीर विश्वास (शालापत्‌रक, पुणें), पवित्‌रतेची प्रार्थना (मनोहर, किर्लोस्करवाडी) अित्यादि श्‌रीयुत ना. स. बापट यांच्या कविता या सङ्ग्रहांत समाविष्ट केलेल्या नाहींत. त्याचप्‌रमाणें त्यांचें "युद्‌धसाह्य अिङ्ग्रजांसि बन्धुंनो करूं नका" या ओळीनें आरम्भ होणारें चामर वृत्तांतील लोकप्‌रिय 'युद्‌धविरोधी गीत', जें कवीचे आदरणीय ज्येष्ठ सहकारी साथी शिरूभाअू लिमये यांनीं गुप्तपणें छापून सर्वत्‌र प्‌रसृत केलेलें होतें व जें बहुतेक सर्व राजकीय युद्‌धविरोधी गटांनीं उपयोगांत आणलें होतें तें, त्याचें कार्य होअून गेलेलें असल्यामुळें या सङ्ग्रहांत समाविष्ट केलेलें नाहीं.

# १ नमनम् ।

( अनुष्टुप् छन्दः )

क्रीडन्ति सततं सिन्धौ वारिणो वीचयस्तथा ।
चित्तेषु सद्विचाराणां येषामनिशमूर्मयः ॥
तासां बाष्पं च वीचीनां यथाम्बरसमुद्गतम् ।
येषां सङ्घो विचाराणां ध्येयमुत्कर्षितो हितम् ॥
तस्माद्बाष्पात्समुद्भूतं मेघजालं मनोहरम् ।
येषां ध्येयात्तथा मूर्ता विस्तीर्णाः कार्ययोजनाः ॥
मेघेभ्योऽवतरत्यम्भो यथा सन्तापशान्तये ।
येषां कार्यं फलीभूतं जनानां दुःखमुक्तये ॥
तान्सज्जनान्विनम्रोऽहं नमामि शिरसा सुधीः ।
यथा वृक्षा जलैस्सिक्ता विनीतशिखराश्च ते ॥

# २ रसिकसृष्टि

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

वेड्या, थाम्ब ! नकोस जाअुं रसिकां आमन्त्रणा द्यावया
आपोआप पहा अिथे खचित ते येतील धांवोनियां;
आम्राचा मकरन्द, गन्ध खुलतो बागेंत वृक्षावरी
जातो का कुणि तेधवां द्विजगणां वर्णावया माधुरी ?

तैसे या रसिकां न भासत मुळीं मार्गांत कांकुटे
त्यांना वाट जिथे कुठे लहर ती जाअील तेथें फुटे;
भानूच्या किरणांसि का जगांत या रोधील साङ्गा धुकें
धांवोनी धरणीकडे सहज ते घेती तियेचे मुके

कोठेंही जगतांत या रसिकते ना भासतें अन्तर
पाताळीं अथवा अुडोनि सहसा जाअील अुन्चावर;
आकाशीं जधिं चन्द्रिका फुलतसे अिन्दू वसे अम्बरीं
तेव्हां थोर खळाळ नाच करितो सिन्धूचिये अन्तरीं.

सामर्थ्य श्रुतिला असोनि बहु तें शब्दां श्रवे दूरुनी
कानांमाजि तयांचिया बसविले दूरध्वनी ते कुणीं;
रानीं कोकिल मन्जु कूजन करी, राहे कवी लाम्ब तो
त्या नादां शतयोजनांवरुनिही अैकोनि सन्तोषतो.

ना. स. बापट

घेअी केवल अेकटी रसिकता चिन्तांत सामावुनी
येअी का कळुनी कधीं अरसिकां ती गूढ भाषा मनीं ?
अर्थावांचुनि बोल बालक झटे बोलावया बोबडे
तत्त्वद्‍यानहि कःपदार्थ गमतें सातेस त्यांच्यापुढें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 1069

# ३ विहगास....

## ( जाति-रसना )

जगानें पीडिलेला अभागी जीव क्वचित् काळीं भेटलेल्या सदय हृदयाकडे साशङ्क वृत्तीनें पाहूं लागला तर त्यांत आश्चर्य तें काय ?

अुडुनी नकोस जाअूं विहगा, अिथे बसाया
झणि येअि येअि राया मजसङ्गतीं हंसाया
भय हें नको मनाला ना सृष्टि राक्षसांची
परि काव्यसृष्टि माझी रसिकांतल्या रसांची
तूं जाणतोस सारें नाहीं दया कसाया
कविला सुचेल कधि का तव घात रे कसा या ?
दृष्टींत अुद्भवावी शङ्का अशी कशाला ?
जरि शब्द गोड माझे हृदि स्थान ना विषाला
विहगा तुला धराया ना पिन्जरा कवीशीं
परि पिन्जरा कवीचा धरण्यासि तूं तयासी
तव देह नाशिण्याला ना क्रूर पारधी मी
सौन्दर्यमूर्ति जीती ना रे कधीं वधीं मी
आतूर सूर झालों अैकावया तुझे मी
कां दूर दूर जाशी ? चित्तामधें थिजें मी
गाणें म्हणेन भावें तूं गीत गोड गावें
अेकांत अेक व्हावें अैकोनि तें जगावें
राहीन आर्जवांच्या सोडीत रामबाणा
येशी-न येशि किंवा चालेल हाचि बाणा
अुडुनी नकोस जाअूं विहगा अिथे बसाया
झणि येअि येअि राया मजसङ्गतीं हंसाया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
* क्रमांक 9220 *

# ४ नदीचा निर्धार !

मी पुनरपि ना परतायाची
ही अशीच पुढतीं जायाची ॥ धृ० ॥
निघे अेकदां गिरिपासूनी
मनांत कितिदां विचार करुनी
समुद्रनाथा वरिन जाअुनी
हा शाश्वतचा निश्चय माझा पाळिन मी तोची ॥ १ ॥
अुदधिनदीच्या सुप्रेमाचा
सङ्गम ज्यांना बघावयाचा
नसेल; परि हेवा करायचा
दुष्ट असे जे असतिल, कोण्डी फोडिन मी त्यांची ॥ २ ॥
मला पाहतां तिकडे जातां
विघ्न अुभविसी काय पर्वता ?
कींव तुझी मज येते आतां
मार्ग अडवितां वळसा घालुनि वाट नवी माझी ॥ ३ ॥
जबडा वांसुनि गिळण्या रागें
हेव्यानें ही दरी मज बघे
काय भिवविसी राक्षसी अगे ?
भेदुनि बघ तव जबडा आलें अपुल्या मार्गासी ॥ ४ ॥
हे तर बेटें खांचाखड्डे
यांनीं यांना गमे पथ अडे
क्षुद्र किति तुम्हि, वेडे ! वेडे !
पहा पदतलीं तुम्हांस तुडवुनि जातें दूर कशी ! ॥ ५ ॥
सत्त्व पाहण्या या हो कोणी
करिशिल कमि जरि ग्रीष्मा पाणी

ओढा जिकडे जिवाचा धनी
जाअिन तिकडे जों न बिन्दुका आटे शेवटची ॥ ६ ॥
पऱ्हे, अुपनद्या सुकुनी गेले
सेवक मजला जरि दुरावले
सोबतीस ना कोणी आले
क्रमीन मार्गा घेअुनि सोबत अेक्या निष्ठेची ॥ ७ ॥
निश्चय माझा हाणायला
घोर हिंवाळा जरी पातला
रुधिर लागलें गोठायाला
तरिहि हिमनदी अब्धिकडे हळुहळु पोंचायाची ॥ ८ ॥
मला ठाअुकें अेकच गाणें
पात्र ओहटो-भरो पुरानें
जीवन माझें अखण्ड गाणें
आतुर हृदयीं-खळखळ गाअी-धडधड प्रेमाची ॥ ९ ॥

# ५ फुलांत मधु कुठचा ?

( जाति–चन्द्रकान्त )

आकाशांतुनि शरत्कालची शोभा बघण्याला
अवनीवरतीं आतुरतेनें दंवबिन्दू आला
आणि लागला न्याहाराया अुच्च स्थानाला
ज्यापासूनी दिसे दूरची शोभा दृष्टीला
वृक्षावरचें पान पाहुनी झणिं हिरवेंचार
बसला तेथें, हंसला, फेंकी दृष्टी चौफेर
तितुक्यांतचि हो लहर येअुनी वायूराजांना
झुळूक नाचे, अपुल्यासङ्गें नाचवि पानांना
त्या पानांना, त्या झुळुकांना आवड नाचाची
नाच चालतां नुरली त्यांना चिन्ता अितरांची
दंवबिन्दूची तनू शहारे, थण्डी कुडकुडली
कुठे अुबारा मिळेल साङ्गा! स्वारी गडबडली
केंविलवाणी मूर्ति रुपेरी घाबरुनी गेली
धरी धिटाअी जाअी कलिके करण्या जागेली
म्हणे, "मैतिरणी खोल पांकळ्या–नयन अतां अुघडी
प्रणयाचे गे खेळ खेळुनी फुलवूं सुन्न घडी"
प्रातःकाळीं प्रिया करितसे स्वागत सजणाचें
तरुवरि किलबिल–मधुरमीलनीं रव वाजन्त्र्यांचे
किंवा द्विजगण मङ्गलाष्टकें म्हणती हर्षांनी
बालार्काच्या सुवर्णाक्षता सहस्र किरणांनीं !
अखण्ड सेवन प्रेमरसाच्या अतुल माधुरीचें

शृङ्गाराच्या क्रीडेमाजी अेकरूप त्यांचें
प्रेमरसाच्या भरतीवरतीं माधुरीस चाखी
अङ्गीं मुरल्या माधुरीस तो शाश्वतची राखी
पिअुनि माधुरी स्वयमेवचि हो मधु दंवबिन्दूचा
बनला रसिका, मधुमय तेव्हां गाभा पुष्पाचा

# ६ अनन्य बहुरूपी.

बालवृत्तिनें तुला पाहिलें जेव्हां अिकडे येवोनी
अुच्छृङ्खळ तूं भाससी अुड्या लाटांनीं त्या घेवोनी.
आणि लागलों जधीं हंसाया खेळ तुझा तो पाहोनी
अुकळी फुटली तुज हास्याची अुन्च अुसळत्या फेसांनीं.
मला वाटलें वेडाविशि मज नक्कल करुनी हास्याची
आठव झाली विनायकाच्या + केलेल्या फसवणुकीची
रोष येअुनी मनांत जेव्हां सन्तापोनी पाहियलें
त्याच वेळि तव लाटांचे ते अधर क्रोधें थरथरले.
सुचलें मज परतफेड होते रागाला जगिं रागाची
वृत्ति जेधवां अशी जराशी झाली तत्त्वद्न्यान्याची
शान्त दृष्टि मग जधीं फेंकिली तुझिया पृष्ठाच्यावरतीं
तोंच पोंचली गभीर वाणी येअुनियां कानांवरतीं
आदर वाटे, हृदयीं झाला अुद्भव जेव्हां प्रेमाचा
खेळ पाहिला अिन्दूसङ्गें तुझ्या बोलत्या भरतीचा
सरसर सरिता तयांसवेंही तुझा चालला जो खेळ
सहस्रशोडषनारीपरिवृत प्रणयी राजा घननीळ.
अरसिक वृत्ती कवी जाहली तुला सागरा बघोनियां
तुझी आढळे भव्य प्रतिभा जीवनकाव्या अैकुनियां
अितुक्यामाजीं सूर्य मावळे काळोखाचा राग मनीं
तुला पाहिलें भीषणरूपीं घोर घुमे त्या रौद्र स्वनीं
खरें कोणतें रूप तुझें कधि कळेल का रे कुणा जरा ?
ठेक्या ठायीं रूपें सगळीं अनन्य तूं बहुरूपि खरा !

---

+ शुकपञ्जरिं कीं हरिण शिरावा पाशीं ।
ही फसगत झाली तैशी ॥
–" सागरास " बॅ. विनायकराव सावरकरकृत.

## ७ सागरान्योक्ति.

[ वृत्त--शार्दूलविक्रीडित ]

वाहोनी जलवाहिन्या भरिति हें पाणी तुझ्यायेथलें,
आकाश प्रतिबिम्बुनी बनवितें अङ्गासि रङ्गें निळें,
मीनांपासुनि घेतलेंस शिकुनी चाञ्चल्य लाटेतलें,
वेड्या, साङ्ग ! परन्तु हें कुठुनियां क्षारत्व सम्पादिलें ?

## ८ कमलान्योक्ति.

सौन्दर्यें मकरन्द गन्ध खुलतां भृङ्गावली लोभवी,
पावित्र्यें अपुल्या अहा कमलिनी देवांसही शोभवी.
का हो ही रमणीय नन्दनवनीं अुत्फुल्ल झाली असे ?
छे ! छे ! ती तर पङ्कपल्वलिं अहो जन्मास आली असे

## ९ स्वातिजलान्योक्ति.

अब्धीशीं अगणीत थेम्ब मिळुनी जावोत मेघांतले
स्वातीमाजि अजी तुषार परि जे आकाशगङ्गेंतले
त्यांना सागरिं तें नको मिसळणें जेथील खारीं जलें
मोतीं वास्तव होअुनी अलगले घेती तळाला स्थळें

## १० आनन्द दे कुणाला ?

सं. नं. ........

### [ जाति–रसना ]

वनतेस पारखा हो बन्दींत पिन्जऱ्याच्या
खग गीत गोड गाओ आनन्द दे कुणाला ?
नव आरसेमहालीं गेल्या चुरोनि कांचा
श्रुतिरम्य नाद नान्दे आनन्द दे कुणाला ?
कोणी विलोल गालीं दुःखाश्रु ढाळतांना
आभास मौक्तिकांचा आनन्द दे कुणाला ?
भूकम्प थोर हा ! हा! अगणीत पुष्करांची
खेळे तुषारमाला आनन्द दे कुणाला ?
वणव्यांत चन्दनाची घे पेट वृक्षराजी
वितरी सुगन्ध सारा आनन्द दे कुणाला ?
होतील अन्ध डोळे ज्योती विझेल आतां
अन्तीं चढे प्रकाशा आनन्द दे कुणाला ?

# ११ डोळे वटारूं नका !

( वृत्त -शार्दूलविक्रीडित )

खेळे बालक हें--नव्हे--गमतसे आनन्दमूर्तीच ही
आकाशीं जणु चन्द्र शोभत असे शोभे तसें हें गृहीं
त्याच्या हातुनि जाहल्या कितिजरी निष्पाप अैशा चुका
साम्भाळोनि तयासि घ्या मृदुवचें, डोळे वटारूं नका !

जें कांहीं दिसणार या जगांत तें सारें नवें त्या हवें
धांवे तेथ, मिळेल खेळ करण्या, आशा अशी पालवे.
क्रोधें दृष्टिकटाक्षबाण करुनी पङ्खांसि विन्धूं नका
स्वच्छन्दी फुलपांखरू अुडतसे, डोळे वटारूं नका !

आकाङ्क्षा रमणीयशा अुगवती चित्तांत बालांचिया
कासारीं कमलें जशीं विकसती सूर्यासि पाहोनियां
त्यांना कौतुकदृष्टिलाभ मिळुं द्या वाढावया सारखा
नैष्ठुर्यें परि हाय होअिल रखा, डोळे वटारूं नका !

पाहोनी नवगोष्टि बालक जगीं साशङ्क चित्तान्तरीं
ना माना भलताच फाजिलपणा निर्भीड प्रश्नां करी
प्रौढांचा व्यवहार कृत्रिम तया नाहीं मुळीं ठाअुका
जिज्ञासा पुरवा; तिला दडपिण्या डोळे वटारूं नका !

तोंपर्यन्त टिकोच अल्लडपणें हें वागणें, वाढणें
झन्झावात सुटोनि संव्सृतिमधें ना जोंवरीं झुन्जणें
बाल्याचा सुकुमार अङकुर कुऱ्हाडींनीं दुखावूं नका
मारा राक्षसवृत्ति ठार तसली ! डोळे वटारूं नका !

जन्माआधि असेल खेळत कुठे स्वर्गात देवाकडे
तारांचे करिं चेण्डु घेअुनि बसे स्वर्गाङगनांचे कडे
जेव्हां भूवर तारका तुटतसे घेण्यासि त्या कन्दुका
छोटा धांवत देवदूत अुतरे; प्रेमें चला घ्या मुका !
डोळे वटारूं नका !

## १२ येवढी दया कसाया दाव !

( सुरीच्या धारेखालीं याहून दुसरी प्रार्थना कोणती होणार ? )

मागत नाहीं अभयदान मी;—नको दयेचें नांव !
पाषाणान्तरिं कुठुनि कृपेचा व्हावा प्रादुर्भाव ?
चारापाणी मांसाला मम यावा म्हणुनी भाव
आजवरी घातलास तोची अुपकारांचा भाव.
तुझिया दारीं गिऱ्हाअिकांची चाले ही कावकाव
आतुर झाले माझ्यावरतीं माराया‌ला ताव.
जिकडे तिकडे मानव खाटिक स्वार्थी सारे साव
वृथा कुठे मी पळूं जगाया करोनि धांवाधांव ?
दाद न मजला मिळेल कोठें असा जगाचा डाव
प्रबलांपुढतीं दुबळयांचा ना निभाव परि पाडाव
जगताच्या पलिकडे मज अतां मिळेल माझा गांव
ओलाण्डाया जगताला या मृत्यूची ही नांव
हम्बरडा अन्तिचा अैकवी जगण्याची का हांव ?
छे ! छे ! घेणें मरतांमरतां देवाजीचें नांव
जीव दवडिण्या दे न यातना—वेळ न भारी लाव,
धडावेगळें शिर होअूं दे, अेकच घाली घाव !
—येवढी दया कसाया दाव !

# १३ टाहो !

## [ वृत्त–शामला ]

( कोमल कमलिनीशीं कुरूप, कठोर, रांकट भुङ्गा घोङ्घावत जातो हें जगाला मधुरमीलनच भासत आलें हें नवल नव्हे काय ? )

झालें कशाला सुन्दरी ? गाभ्यांत कां ही माधुरी ?
होतें कळी, होतें बरी; अुत्फुल्लता घाता करी !
काया सुमाची कोमला देवा दिली कां हो मला ?
कामूक भुङ्गा लोभला नाशी सुखाशीं पातला
येथें फुलांच्या भोंवतीं भुङ्गे पहा घोङ्घावती
अीशा अशी कां पद्धती ? दैत्यांचिया हातीं रति
अैशा अलीवांचूनि या स्वर्गातुनी त्या तूझिया
येअी न का धाडावया ? साजेलशा योग्य प्रिया
सारे कवी हे मानवी भाषा फुलांची त्यां नवी
तैशी कळायाला हवी भुङ्ग्यांत वृत्ती पाशवी
झाली पुरे ही पुष्पता ! लाभो सुखी पाषाणता !
कोमेजवोनी मुक्तता देशील सन्ध्ये का अतां ?

# १४ भाविनीस....

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

गातों गायन मी तुझ्यावरि–जरी नाहींस तूं अैकण्या,
डोळे लावुनि बैसतों–तव दिशा अद्न्यात माझ्या मना,
पाहीं वाट सदा–जरी न कळतें येशील केव्हां घरीं,
ना झाला सहवासही क्षण–परी तूं ओळखीची पुरी

आयुर्मार्ग तुझा कुठून जगतीं जाअी सखे साम्प्रति ?
सौख्यांच्या शिखरांसि शोभवित का येतेस भेटीप्रति ?
त्या सौख्यांत असेच माहित तुला माझी समा वांटणी
तीही भोग; मदर्थ गोड स्मृति त्या येशील ना घेअुनी ?

कीं मेघांत जशी अनाथ अबला विद्युल्लता सांपडे
तूं तैशी विपदांत जीवितपथीं अेकाकिनी का गडे ?
होण्याला तव सोबती, कर तुला देण्या निघालों परी
पोचूं हाय कसा स्थळा तव? मध्यें अद्न्याततेची दरी !

मच्चित्तीं तरि कम्प अुत्सुक अुठे होतील भेटी कुठे ?
होतां मीलन वाळवण्टही जरी अुद्यानतेनें नटे
तूं येतां जवळी शुभे, शरमुनी जातील तीं सङ्कटें
बालार्का मिळतां अुषा, तमभयें गेलीं कुठेच्या कुठे !

ना. स. बापट

'अब्धीवाचुनियां स्थळास दुसऱ्या जाणार कोठें नदी ?'
वा त्याची भरती तिच्याविण कुणी घेईल कैशी हृदीं ?
वाटेला मिळणार वाट अपुली याची असो निश्चिति !
आशांना मधु साधण्यासि जमतीं जीवांसि आली गति

पापांपासुनि रक्षकांसम मला राखावया चाहुल
येई नित्य तुझी पडेल मग कां हें वांकडें पाउल ?

# १५ निळया निळया साडींतून....

[ छन्द–देवीवर ]

निळया निळया साडींतून
लावुं नको ग चटका
घालुं नको येरझारा
दर्शनाचा देत वारा

निळया निळया साडींतून
माझ्या ठीकाणच्या मना
तुझी धान्दलीची चाल
सये, करिते बेताल

निळया निळया साडींतून
निळया निळया आकाशांत
दूरवरून पाहणें
चान्दव्याचें डोकावणें

सदा निळया साडींतून
निळया निळया सागरांत
पदराची हालचाल
लाटांतून चाले खेळ

निळया निळया साडींतून
बागेंतल्या ताटव्यांत
तुला हंसण्याचा भर
मोगरीला ये बहर

निळया निळया साडींतून
राजहंन्सा बोलावीती
तुझे भुलवीती डोळे
तुला तळयांत कमळें

निळया निळया साडींतून
यमुनेच्या डोहांतून
लाम्ब वेणी डोलूं जातां
काळनाग झाला जीता

निळया निळया साडींतून
कोटरींच्या कोकीळेचें
तुझें लाघवी बोलणें
गोड गोड येओ गाणें



ना. स. बापट

निळ्या निळ्या साडींतून दूर जाशी चूपचाप
ठेवुनीयां माझ्या मनीं मौनतेचे गोड छाप

निळ्या निळ्या साडींतून येअिजाअी वारंवार
निळ्या निळ्या ढगांतून चातकाला मिळो धार

# १६ ही व्यर्थ कशाला लाज गडे ?

( जाति–नववधू )

ही व्यर्थ कशाला लाज गडे ?
तव भावव्यक्तता कुठे अडे ? ॥ धृ०॥

मनांत सारी अुडतां खळबळ
दडवाया ती गमवुं नको बळ
खुळे, यत्न हे होतिल निष्फळ
अणि चौर्य मात्र तव हो अुघडें ॥ ही व्यर्थ० ॥

नसतां, दिसतों मी तुज नयनां
असतां जवळी, मज बघसी ना
काय साङ्ग परि तुला मजविना
दिसणार अगे दुसरिकडे ? ॥ ही व्यर्थ० ॥

निरखिसि मम अुमटलीं पाअुलें
पथीं भेटतां परी प्रेमले
पाहिजेत तुज मार्ग निराळे
जरि पदें स्फुरति मत्स्थलाकडे ॥ ही व्यर्थ० ॥

अुच्चारित कितिकांचीं नांवें
ओंवित ओंवुनि तूं तीं गावें
माझें नांव न तुजला ठावें
जें स्मृतींतल्या विस्मृतित दडे ॥ ही व्यर्थ० ॥

तुजपासुनि तव दूर पळे मन
भावितेस वर ढोङ्गी जोगिण
खेळशील हा लपण्डाव पण
किति वेळ असा तूं साङ्ग पुढें ? ॥ ही व्यर्थ० ॥

नों. क्र. १४१२८
२।२।७३
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०८१

# १७ निरोपाच्या नजरेंत....

[ छन्द–देवीवर ]

निरोपाच्या नजरेंत पाहुनी घे पुरा मला
होओन मी दृष्टीआड मिटूं नको पापणीला.

निरोपाच्या नजरेंत सांठलेला अितिहास
तुझ्यामाझ्या ओळखीचा नीट वाचूं ये ग त्यास

निरोपाच्या नजरेंत अुषा डोकावे तेजाची
ओसण्डून येओ आशा तींत पूढच्या भेटीची.

निरोपाच्या नजरेंत करूं नको ओले डोळे
तुला व्याकूळ पाहूनी धीर अश्रूंत ओघळे

निरोपाच्या नजरेंत कधीं काळीं घडलेलें
लुटुपुटूचें भाण्डण जावो जळून सगळें

निरोपाच्या नजरेंत कां तूं कावरीबावरी ?
माझें असेंच राहील मन पुढें तुझ्यावरी

निरोपाच्या नजरेंत घालितेस किती धाक ?
साङ्गतेस का अथवा 'प्रीत अेकनिष्ठ राख' ?

निरोपाच्या नजरेंत अेकवटे तुझें सारें
प्रेम आणीक सौन्दर्य कधीं कमी न होणारें

निरोपाच्या नजरेंत शीतलशा दोन ज्योती
दूर जातां प्रियकरा पाठवणी ओंवाळीती

निरोपाच्या नजरेंत धरे, तुला तोषवून
जाती सन्ध्येचे किरण अुद्यां येण्या परतून

निरोपाच्या नजरेंत अशी करूं देवघेव
आणि स्मृतीवर तिच्या मग रमवूं ये जीव

# १८ साङ्गणें जाहला काय सख्या अपराध?

(नागपुरच्या 'विहङ्गम' मासिकाचे संपादक प्रो. या. मु. पाठक या साहित्यिकांनीं कवीच्या कविता आपल्या सुप्रसिद्ध मासिकांत प्रसिद्ध करून त्याला अुत्तेजन दिलें होतें. पुढें पुढें त्यांचें पत्र येअीनासें झालें तेव्हां कवीनें खालील काव्यमय पत्र त्यांस धाडिलें होतें.)

साङ्गणें जाहला काय सख्या अपराध?
भासतो असा कां लोभाला हा बाध? ॥ धृ० ॥

पाजिलेंत मजला अुत्तेजन–जीवन
वाढला तरू हा पानें गाती गान
अन् माळीदादा झांकलेत कां कान? ॥ सांङ्गणें० ॥

सोडाल शब्दशर खोलुनि अपुला कोश
झेलण्यांत त्यांना मानिन मी सन्तोष
पण नको गड्या हा अबोल्यांतला रोष ॥ साङ्गणें० ॥

केलात लोभ का सोडुनि देण्यासाठीं?
फुलविलींत पुष्पें का निर्माल्यासाठीं?
तोडण्यास दोरी सान्धल्यात का गांठी? ॥ साङ्गणें० ॥

## १९ प्रीतीची व्याकुळता

[ जाति–भूपतिवैभव ]

प्रभुवरा तुला मी साङ्ग कशी आलिङ्गूं ?
समसमानतेच्या अहङ्कारिं कां झिङ्गूं ?

तव स्पर्शविद्युतीं काया कां बहरावी ?
कां स्वप्नसृष्टिमधिं सुखशुद्धी हरवावी ?

साकल्यें बघतां डोळ्यांनीं तव रूप
मग मधलें अन्तर देअिल कष्ट अमूप

येअूनि बैसतां पायाच्या टोकाशीं
जातील दूर मुखसौन्दर्याच्या राशी

तव शब्द अैकतां जीवाच्या कानांहीं
भानहीन होअिन मूर्त देखिण्यालाही

प्रभुवरा तुला कथ पुरी कशी मी भेटूं ?
कीं अेकसारखी अशीच कण्ठीं दाटूं ?

द्वैताच्या लतिकेवर कां फुलते प्रीति ?
अद्वैत साधण्या आर्तांची जर गीति ?

## २० हे सह्याद्रि !

अुन्च नभाशीं भिडून पर्वत कैक जगांतून
राहिले विशाल डौलानें;
सह्याद्री, तरि थोर थोरवी तव अितरांहून
देखिली खऱ्या मराठ्यानें

दुबळ्यांचा हा तुला समर्था, प्रणामकर जाण
दिलेला पहिला घे मान;
पायथ्यावरी विनम्रतेनें भाट अुभा दीन
भक्तिनें लवलेली मान.

अितिहासींच्या तिथुनि आजच्या पोंचुनियां स्थाना
अेकल्या तुला स्तवीतांना
नको निराळीं कृतद्न्य काव्यें सरल्या पितरांना
मन्दिरें निसर्गदेवींना

प्रीतिझरे सोडुनी जादुच्या झारीनें बा रे
शिम्पितां सुपिके पाषाण;
तव स्पर्शाच्या चैतन्यानें प्रसन्न ते वारे
आणिती मेलेल्यां प्राण.

कुशींत बिलगूं तुझ्या आश्रयें करूं जधीं हल्ले
धरावे दूर परें पल्ले;

छातीवरतीं मण्डित झाले कार्यांचे किल्ले
शिपाया, शौर्याचे बिल्ले.

महाराष्ट्राच्या पुण्याओनें धोका ना कांहीं
तुझ्यावर झाडखड्यालाही
ज्वालामुखिना, भूकम्पांना शपथ जगाची ही
असे दिन दिसोत पुढतींही

शुभशिखरांच्या सह्या सखया, तूं स्वातन्त्र्याच्या
रवीच्या अुदयाचा शैल;
पुराणपुरुषा, तुलाच ठावें नवमाङ्गल्याच्या
दिशा त्या केव्हां फुटतील.

कशास पायीं तुडवीत हिमें वाटेच्यावरचीं
दूरच्या कैलासा जाअूं ?
रायगडावर जिती समाधी जी शिवदेवाची
तिच्याशीं विलीनता पावूं.

पश्चिमसागर गभीर स्तोत्रीं करावया सेवा
झटतसे धुवावया पाय
बोल बोबडा, भाव भाबडा तिथे महादेवा
अर्पिला कळेल तरि काय ?

## २१ अन्योक्ति....

लोपतसे पौर्णिमा पिठोरी
घोर यामिनी ये अन्धारी
मनश्चक्षुंनीं बघुनि चन्द्रिका मार्ग कुठे धरणार ?

तरवारींनो, बोथटधारी
होतां रिपुला जरि भयकारी
तीक्ष्ण धार गत आठवोनि का अरि तुम्हांस भिणार ?

वणव्यामाजी पेटे घरटें
विहगा, ठेपे दैव करण्टें
विहार मागिल स्मरणीं चिन्तुनि कसा जगीं तगणार ?

डोईवरतीं तळपे भानू
ऊन्ह रखरखी जळाली तनू
सकाळ शीतल मनांत आणुनि छलन कसें चुकणार ?

ग्रीष्मर्तूतिल शुष्क पुष्करा,
मुखिचा शीतल आटला झरा
पूर्ववृत्त तुज विचारण्या कुणि ढुङ्कुनि का पहाणार ?

गेली सत्ता, गेली मत्ता
अरे दरिद्री चारूदत्ता
सगेसोयरे अितिहासींच्या धनवांना नसणार !

# २२ किल्यांत कशाला जाऊं ?

(पारतन्त्र्यांत खितपतणाऱ्या राष्ट्रांतील मानधन व्यक्ति आपल्या स्वतन्त्र शूर पूर्वजांनीं बान्धलेल्या किल्ल्यांविषयीं याहून दुसऱ्या कोणत्या भावना व्यक्त करणार ?)

[ जाति–अद्‌धव ]

किल्ल्यांत कशाला जाऊं मी गुलाम ना जगताचा ?
चालुनि त्या पुण्यक्षेत्रा करुं कसा स्पर्श पायांचा ?
अपराध नव्हे का घोर चन्दनासि तुडवायाचा ?
जगतांतल्या गुलामानें
या अपमानित जीवानें
स्वच्छन्द अशा अिच्छेनें
कुठल्या हो अधिकारानें त्या गडां पाहण्या जाणें ?

जाअूनि पूर्विच्या काळीं आमुच्या वाडवडिलांनीं
हृदयाचे कोट करोनी विक्रान्त खड्ग घेवोनी
खेळतां युद्ध शत्रूंशीं शिम्पिले सडे रक्तांनीं
अुभविले कीर्तिचे वाडे
करणीचे नव पोवाडे
परि भवन आज तें मोडे
मग कशास तेथें जाअूं ? तें स्मशान सारें पाहूं ?

हे किल्ले मित्र कुणाचे ? जे शूरवीर हो त्यांचे
करितात साहय्य कोणाला ? देशार्थ हाति शिर ज्यांचें
अुघडतात अपुलीं द्वारें स्वागत करण्या धीरांचें !
देशवीर जेथें जमले
ज्याठायिं हुतात्मे रमले
मन्दीर थोर हें असलें
का असे योग्यता माझी मन्दिरीं अशा जाण्याची ?

रक्ताचा शाओ करुनी अितिहास असे जो लिहिला
त्या कडेकपारींमाजी दिसतसे जरा पुसलेला
हें जीवन कसलें माझें ! ना तया तजेला दिधला
परि जाअुनियां नुसतेंच
आठवोनि झालें तेंच
जो शिळा लेख तो तोच
अेकसारखा वाचुनियां काळ कां दवडिणें वांया ?

आपुल्या समाधीमाजी राहतात पूर्वज तेथें
हें काळें तोंड गुलामी दाखवूं कसें हो त्यातें ?
हांसतील मजला सारे देतील घोर शापातें
वंश्शज हा त्यांचा दुबळा
मांसाचा जगता गोळा
सारखाच जगला मेला
हें कळवाया ना त्यातें आज जाअुं मी किल्ल्यातें?

पोंचतां गडाच्या द्वारीं मार्गाच्या मधली रेती
अग्नीसम होउनि क्रुद्ध चटके देइल पायां ती
बघतील वटारुनि डोळे मोडक्या तटांच्या भिन्ती
मग होइल मेलें मेलें
वरि कसें करूं मुख अपुलें
लज्जीत असे जें झालें
धिक्कार करूनि घेण्या ना आज भेटणें किल्ल्यांना ?

वडिलांच्या अपुऱ्या अिच्छा येतील भूतरूपानें
ना तृप्ति तयांची झाली बसतील माझिया माने
ते जुने जुने वटवृक्ष थुङ्कतील अपुलीं पानें
माहीत मला हें सारें
किल्ल्याच्या आंतील वारें
होतील मनावर मारे
ते सहन सारखे करणें कोडगेपणानें जाणें

बसुनियां गडाच्यावरतीं कवितेंत कल्पना रचिल्या
परि काय असे अुपयोग ? ठरतील जल्पना सगळ्या
का प्रसन्न होअिल भाग्य बघुनि या नाटकी चाळ्यां ?
किल्ल्यांत असे जर जाणें
गतकालवैभवा बघणें
पहिल्यानें नवधन घेणें
जोंवरि ना हें झालें तों पाहुं मी कसा किल्ला तो ?

## २३ स्वातन्त्र्यलक्ष्मीस....

[ वृत्त–सुमन्दारमाला ]

अलङ्कार मोठा जगांतील स्त्रीजातिला लाभलेला तुझाची असे
सुराज्याचिया वैभवा भोगणारी तुझ्या व्यक्तिठायीं अगे श्री वसे,
महीषासुरा मर्दि जें चण्डचैतन्य तें सत्स्वरूपीं तुझ्या येतसे,
प्रतीकेंच सच्छक्तिचीं जेथ सामावलेलीं असें स्थान तूं पूज्यसें.

ढळे ना कधीं स्वस्थळाहून तारा चिरायू ध्रुवाचा निळ्या अम्बरीं
तयाच्यासवें मात्र निर्धार कार्यीं चळे जो न तो थोर स्पर्धा करी.
रवीच्या रथींचा तुला योग्य घोडा रणीं माण्ड ठोकूनि झेंपावया.
महात्मे जगांतील हर्षोनि गेले तुझ्या दर्शनाला अगे, घ्यावया

अहा सम्भवानें तुझ्या पावलेलीं महाधन्यता भारतीचीं कुलें
नृपाचें तुझ्यानेंच आदर्श अर्धाङ्ग झाली प्रजा गे तुझी तीं मुलें
जरेच्या कळा त्या सुतेजस्विनीला तुला लाञ्छवाया धजाव्या कशा ?
दिशा दावुनी लुप्त तारुण्यवर्ती जशी कीं नव्या तूं युगाची अुषा

स्वतः व्योम सोडूनियां वीज आली तुझीया कराला बनोनी असी
अविश्रान्त त्या हालचाली रणींच्या! महाब्धींत लाटा पुऱ्या लाजती ! !
तुझ्या विक्रमाला प्रदर्शावयाला क्षिती ही ठरावी अपूरी अशी
चिता भव्य सोपान ज्वाळांचिया पायऱ्यांनींच स्वर्गांत अुड्डाणसी

जगीं ना कुणी पाशवी शक्त शक्ती तुझें राज्य राणी करी खालसा
स्वसत्तेंतल्या वंशजांच्या हृदांच्या चिरञ्जीव सिंव्हासनीं या बसा
स्मृतीच्या तुझ्या खोल पाळांमुळांनीं तरू भक्तिचा सारखा वाढता
सदा सत्कृतींच्या फळांनीं फुलो तो; मिळावी जगीं भारता मान्यता



झांशीची राणी लक्ष्मीबाअी

# २४ आव्हान !

( जाति–नववधू )

वाफेस कुणीही अडवुं नका !
हा खटाटोप जाओल फुका ।।धृ०।।

तिला हवी ती अेकच मुक्ति
अुपयोजुनियां पाशवि शक्ति
रोधाया जरि कराल युक्ति
तरि दडपणांत ती दबेल का ? ।। १ ।।

प्रथम कांहिंशी दिसेल खचली
भासे सक्ती सफल जाहली
सुप्त स्फूर्ती अुठेल वेळीं
अुडविण्यासि दाबाचा धक्का ।। २ ।।

केल्या कवचा काठिण्याच्या
अडविण्यास तिज, ठरतिल त्यांच्या
ठिसूळ कांचा कुचकामाच्या
अन् अुपाय अन्तीं पडे फिका ।। ३ ।।

अतिरेकानें कोण्ड कोण्डितां
बन्द जाहल्या सार्‍या वाटा

निर्वाणीनें स्फुरेल स्फोटा
घेओल पहा साधुनि सुटका ॥ ४ ॥

भव्य कार्य जरि भव्य न मूर्ति
करील अपुरी अिच्छापूर्ति
ही वाफेची दिगन्त कीर्ति
हव्यास खलांनो कां अितुका ? ॥ ५ ॥

# २५ सूडाचें गाणें....

( जाति–गोविन्द )

धडपड सूडाच्यासाठीं !
जीवितांत या सूडापरती महति कसलि मोठी ?

दशमुख जेव्हां निजबाणानें रामानें वधिला
का सीतेस्तव ? रघुवंशाच्या बळि अुपमर्दाला

तुटे मुङगळा त्वचा चावतां हौस न मरणाची
तीव्र मनीषा खाद्यहराच्या परि प्रतिशोधाची

जाय मक्षिका कैक योजनें धांवत पाठोपाठ
मधु–आशा नच, सूडासाठीं अुठवायाला गांठ्

सर्प दंशतो; तो का शोणित चाखाया म्हणुनी ?
पुच्छ दुखविलें, म्हणुनि घेतसे वैरा साधोनी

नवल नव्हे मुळि सूडेच्छा ही जिवन्तशा प्राण्यास
मेलेला तो जो जगतो जगिं सोडुनि या बाण्यास !

## २६ निन्दकांस....

( जाति–वसन्त )

महन्ताच्यासवें येती मठाच्या शिष्यिणी कोणी
म्हणाया ना चुकायाचे 'अहो येथें मुरे पाणी'

प्रवासी पीतसे प्याला पयाचा नारळीखालीं
तयाला 'मद्यपी' अैशी कुसंज्ञ्या प्राप्त जाहाली

क्रमाङ्का अुच्च घेवोनी परीक्षा होत अुत्तीर्ण
'तयें सन्धान बान्धियलें' वचां या अैकती कर्ण

गन्यांना टाकुनी देती पहाती चारखण्डांना
गुलाबाला न हुङगोनी निन्दिती तीक्ष्ण कांट्यांना

वणावाचून का कोठें बसाया स्थान काकाला ?
कळे का कुम्भकर्णाच्या, सुरांची तान कानाला ?

चला या निन्दकांनो मी तुम्हांला नित्य आमन्त्रीं
मुखाचीं कार्यप्रारम्भीं घुमूं द्या दीर्घ वाजन्त्रीं

कृतींना माझिया ठेवा कितीही दूषणें तुम्ही
तयां राहीन मानोनी दिलेलीं भूषणें नामी

कधीं भानू जुमानी का ढगांच्या व्यर्थ आरोळ्या ?
प्रकाशे शेवटीं तेजें, अुपेक्षी क्षूद्र त्या चाळ्यां

खुटाया कार्यवृक्षाला जिभेच्या घोर घावानें
पहातां; वाढतो देखा तरी तो जो जोमजोमानें

चहाच्या वादळाऐसा गमे यांचा मला धन्दा
मुळीं पर्वा नसे त्यांची ! कुणी निन्दा पदां वन्दा

# २७ निद्रे !

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

निद्रे, येशिल का जरा निजविण्या अङ्कांवरी आपुल्या
प्रेमानें जननी जशी निजविते बाळास कण्टाळल्या
डोळ्यांना अपुल्या मिटोनि अगदीं भानू पुरा झोंपला !
अिन्दूही विटुनि कुठें बघ अमावास्येस या लोपला

कोणीही दिसतो न धीर मिळण्या पाहोनि तोण्डाकडे
आतां आश्रय अेक मात्र अुरला देशील का तो गडे ?
मायेचें तव पाङघरूण मजला घालावया . सत्वरी
ये, ये, सह्य न हा विलम्ब ! हृदयीं बोंचे भयाची सुरी

रात्रीचा भयकारि क्रूर पसरी थैमान सैतान तो
काळा वेष, कुकर्मदर्शक करी काळे दिवे लावितो
दृश्यां रातकिडे जरी भयद या पाहूनि आनन्दले
आहें मानव मी, कसा बघुं शकें हे रङग रात्रींतले ?

माझ्यावांचुनि सर्व सृष्टि तुझिया गोडींतुनी गुङगते
सारे निर्जिव नी सजीव जगिचे स्वप्नांतुनी दङग ते
लोभाच्यामधि पक्षपात मग कां चाले तुझ्या मन्दिरीं
वेलींच्या निजल्या कळ्यांवरि तुझी प्रीती न माझ्यावरी

या पापी जगतांतुनी क्षण जरा लाभेल का मुक्तता ?
निद्रे, येशिल का जरा दुरविण्या चित्तांतली व्यग्रता ?

## २८ अेक अनुभव....

( जाति–भूपतिवैभव )

वाटलें मला मी होतों जेव्हां द्न्यानी
अुपहांसति जन मज लेखुनियां अद्न्यानी

सागरांत जातां खोल खोल द्न्यानाच्या
लागलों तरङ्गूं वरवर जनदृष्टीच्या

पाहंतां मिळविण्या द्न्यान जगींचें सारें
अेकट्या मनाचें बल तें ठरलें अपुरें

मग कळे राहि किति मानव जगिं अद्न्यानी
तों आरोपाया मला लागले 'द्न्यानी'

## २९ माझ्या एका सुखास

[ वृत्त-अर्धवियोगिनी ]

तुज पाहुनियां कुठेतरी
हुरळून तसाचि धांवतों;
नच लाभसि माझिया करीं
अन् निष्फळतेस पावतों.
मग होंअि निरिच्छ अन्तरीं
नि पराङ्मुखतेंत ठाकतों
तितुक्यांत मिठी तुझी परी
पडुनी हृदयीं सुखावतों.

## ३० देव तोच !

[ जाति-दिण्डी ]

गुरफटे अस्पष्टत्वांत गूढ कांहीं
शोधिण्या तें कल्पना तिथें जाअी
तिच्या हातिं न ये अुडे अुंच अुंच
आणि सारे वदतात 'देव तोच'

# ३१ शिववंश

## [ अनुष्टुप छन्द ]

(कवीच्या शिववंश या सङ्कल्पित महाकाव्यांतील अेक सर्ग जेवढा रचून झाला होता तो वानगीदाखल अिथे 'अुल्हासिकें'त दिला आहे. )

सणांची सगळ्या राणी        सजली रङ्गपञ्चमी
स्वर्गेची श्री तिची दासी        अुत्सवा काय हो कमी?

धनवान लखूजीच्या        मराठे जमले घरीं
पौर्णिमेला जसे तारे        चन्द्रग्रह अम्बरीं

प्रौढांचें लक्ष वेधोनी        बालकें दोन खेळती
अुच्च वृक्षांमध्यें छोटीं        फुलझाडेंच वाढतीं

बालभावानुषङ्गानें        थोरांचा अनुकार तो
अेकमेकांवरी त्यांचा        चालला रङ्गफेंक तो

सरी त्या लास्य हास्याच्या        सागरीं लहरी जशा
कणस्फूर्ती गुलालाच्या        फेनवारितुषारशा

जेधवां जाधवा चित्रा        रम्य त्या पाहण्या रुचे
विनोद सुचला वृद्धा        कवीला काव्य कीं सुचे

गौरीशङ्कर अङ्कींचा        शहाजी; आणि शोभत
नन्दादेवी जिजाबाओ        लखूजी शुभ्रपर्वत



ना. स. बापट

प्रेमें स्पर्शुनियां पाठी शिशूंच्या राव बोलला
'जणूं वीरजयश्रीचा जोडा जुळत चाङगला'

हर्ष साङगत सर्वांना मालोजीचा सुटे ':अहो
लखूजीची जिजू आतां मालोजीचीच सून हो'

जरा बालकरीं वस्तू कांहींही द्या 'तुझी' वदा
आनन्दधन्य लाडांना हवी त्यांचीच ती सदा

तसें पाहुनिया झालें रागें जाधव पेटतो
सुप्त ज्वालामुखी निद्रा टाकुनी अंग ओकतो

'कशी देअिन मत्कन्या पुत्राला तव चाकरा ?
महाद्रीची मिळे कन्या सागरा; नच निर्झरा'

शस्त्रें ना परि शब्दांनीं हृद जाय दुभङगुनी
हिम ना तें शिलाघातें वितळ परि रश्मिनीं

विदीर्ण हृदयीं झाला भोंसला अवमानिला
सोयरीक प्रतिद्न्येनें भीष्म भीषण भासला

मनीयांच्या कलिकांचीं अस्तित्वें फुलवावया
अशक्या शक्यवायाला देवी, दैवी हवी दया

औशाला आळवायाला नोकरी टाकुनी घरीं
नाङगरी बनुनी राही जपमाळ धरी करीं

प्रतिस्पर्धी लखूजी हो त्याचा जो पहिला धनी
सर्वस्वाचा अतां स्वामी कुलदैवत होअुनी

(अपूर्ण)

## ३२ द्न्यात्यांस....

[ गद्यकाव्य ]

१

हाय! हाय! काय हा तुझ्या द्न्यानाचा हीन अुपयोग! तूं आरामांत शिक्षण घेत असतांना ज्यांना श्रम करावे लागत होते त्यांच्यावरच तूं अुलटला आहेस. तुझी वैयक्तिक चैन चालावी म्हणून तूं त्यांच्या अद्न्यानाचा लाभ घेअून कांहींतरी थोताण्ड अुभारून त्यांचे पैसे लुटीत आहेस. या दीनदुबळ्यांना लुटण्यासाठीं ज्या सम्भावित संस्था निर्माण झाल्या आहेत त्यांना आपल्या द्न्यानानें योजना सुचवून तूं या अमानुष आप्पलपोटेपणांत सामील होत आहेस. पाजलेल्या दुधाचें विष बनवून, दूध पाजणाऱ्यांना रुधिराच्या तृष्णेसाठीं दंश करून ठार मारणाऱ्या सर्पासारखा तूं आहेस.

२

तुला तुझ्या द्न्यानाची मूक घमेण्ड दिसते. पण तुझ्या द्न्यानावर सम्भावितपणाची टोपली अुपडी पडल्यानें तुझें द्न्यान दिसावें कसें? तूं द्न्यान मिळवीत होतास तेव्हां ज्यांनीं तुझें पोषण केलें त्या दारिद्र्यानें वांकलेल्या अुपकारकर्त्यांचा तुला विसर पडलेला दिसतो. अरे, तुझे सगे अद्न्यानांत आहेत; क्षुल्लक गोष्टींत कालव्यय करीत आहेत. तुला त्यांना कांहीं सांगावेंसें वाटत नाहीं काय? पुस्तकांच्या अतिरेकी सहवासापासून तुझ्या शरीराचा आकार मनुष्यासारखा राहिला असला तरी गुणांचें किंवा अुपयोगाच्या दृष्टीनें तूं मनुष्याच्या रूपांतले जणुं निर्जीव पुस्तकच झाला आहेस. जसें कांहीं कोंपऱ्यांत पडलेलें वाचाहीन पुस्तक! आंतमध्यें पुष्कळ पाणी असूनही तृषार्तांना ज्याचा कांहींच अुपयोग नाहीं अशा ओसाड जागेंतल्या आडासारखा तूं चैतन्यहीन आणि भयाण दिसत आहेस!



ना. स. बापट

अरे द्न्यात्या, तुला मातर मी वन्दन करीत आहें. तुझ्या जीवनांत तुझ्या द्न्यानाचा परिपूर्ण अुपयोग तुला तर होत आहेच, पण तुझें जीवन-चरित्र पाहून असें वाटतें कीं श्रम करून दमणाऱ्या भागणाऱ्या मनुष्याचें काम कुटुम्बासाठीं केलेलें असतें तसें तूं हें सारें द्न्यान आमच्यासारख्या मन्दमति वामनांसाठीं मिळविलेलें आहेस. तुझ्या वाढत्या द्न्यानाबरोबर आम्हांला आनन्द होतो. सूर्याची प्रभा फांकल्यावर फुलें दृश्यमान होअून झाडें जशीं हंसतात तसें आम्हीही तुझ्या द्न्यानाचा प्रभाव जगांत पडलेला पाहून आनन्दी होतों. पाणी पाडणारा दाट ढग जसा रमणीय नि अुपकारी तसेंच तुझें तें मन! हा मानवांचा ताण्डा जो सौख्याच्या स्थानास धुण्डीत आहे त्याचा अद्न्यानाच्या अन्धःकारांतील तूं दिवा झाला आहेस. तुझ्यावर आमचा विश्वास आहे. हे सन्त! चिल्यापिल्यांना स्तनांतून दूध भरपूर पितां यावें म्हणून जशी मायाळू माता सकस अन्न खाते त्याप्रमाणें आम्हांला द्न्यानाचा झरा अखण्ड पाजतां यावा म्हणून तूं परिश्रमपूर्वक द्न्यान मिळवीत असतांना आम्ही तुझ्याविषयीं कृतद्न्यता दर्शवीत आहों.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. नं. ३१०५
१२२०
स्थळ प्रत

## ३३ निद्रित बालकास....

[ वृत्तें-उपेन्द्रवज्रा व इन्द्रवज्रा ]

निजा, निजा, शान्त असेच बाळा
मुळीं न चालो कसलाचि चाळा
कळीप्रमाणें मिटुनीच डोळा
सुखी करूनी कविच्या जगाला

बाळा तुला ना कसलीच भीति
माता कुशींच्या अुभवीत भिन्ती
चिन्ता तुझ्या शब्द मना न ठावा
सद्भाग्य ज्याचा करणार हेवा

नाकांतुनी श्वास हळूच येअी
जैसें नवें फूल सुगन्ध देअी
गम्भीर सुप्ता तव सर्व भाव
भोगा समाधी जणुं योगिराव

केसांत आच्छादित कर्णपाळी
मेघांतली चन्द्रकलाच झाली
अङ्गावरी तो लघु वस्त्रभार
लावण्य कीं शोभवितें शरीर

नभांतल्या तेजस तारकांनीं
'मुलास जा खालुनि या बघोनी'
म्हणोनि असें, कर पाठवीले
मुखावरी जे नित थाम्बलेले

श्यामाळ भ्रूंच्या लवत्या कमानी
कीं शुभ्र चित्रा जणु पार्श्वभूमि!
त्याही कशा निश्चल पूर्ण झाल्या!
छायेंत विश्रान्तित धेनु काळ्या

भारी तुला आवड कौतुकाची
त्याकारणें पूर्विच खेळलासी
वैशिष्ठ्यपूर्णा तव ह्याच रीती
निद्रेंतही कौतुक ज्या वरीती

लकेर आली हळु सङ्गिताची
अुडेल जेथें तव झोंप साची
तिथे कशाला अधिकोनि बोला?
तुला सतावूं? बरवा अबोला

मी मूक होअूनि तरी बघूं ना?
मद्दृष्टि नेत्रां तव पोंचतांना
कीं पापण्यांआंतिल बाहुल्यांना
होओील का त्रास? अुठेल राणा!

कसा परी जाअुं अुठून दूर?
होअूं स्वताशींच कशास क्रूर?

सुचित्र जे सोडुनि जात नेत्र
तयां म्हणावें जणुं नष्टनेत्र

छोट्या मुठी आंवळिल्या कशाला ?
रागावलां का जगिच्या कुणाला ?
कीं आंत जो ताम्बुस सान गाभा
ना योग्य त्याच्या अम्हि दृष्टिलाभा ?

वर्णावया नाजुक त्या त्वचेला
नाहीं पुरी कोमलता जिभेला
कार्पासशय्याहि असह्य जीला
निद्रेंतही स्वेद म्हणोनि आला

स्वर्गातल्या कल्पतरूवरून
ओठांवरी येत बदाम दोन
गट्टी तयांच्या अजि पाकळ्यांची
कीं शारदेच्या कृति कुन्चल्याची

ती सान छाती वर आणि खालीं
वर्णावया योग्य जपून भारी
तो श्वास सत्यम्शिवसुन्दराचा
अुच्छ्वास आयुष्यज शान्ततेचा

बघून घ्या अेकच अेक दृश्य !
काव्यान्ध येथें कवि हो अवश्य
निसर्ग नी मानव अेक झाला
जुळे जरा स्वर्ग अिथे जगाला

## वृत्त–शार्दूलविक्रीडित

माङ्गल्यांत, पवित्रतेंत, सुषमेमाजी अुषेसारखे;
शुक्राचें नवतेजही ठरविती तेजें स्वतःच्या फिकें;
ज्यायोगें अितिहास शोभत जसा सन्मौक्तिकीं सागर;
साण्डी शोणित बिन्दु–जे न सुकती–लोकीं हुतात्मा नर.

जेव्हां हे गळतात बिन्दु भुवनीं तो काळ होअी सण;
स्थानें आणिक प्राप्त घेत करुनी क्षेत्रांतले सद्‌गुण;
पाणी वाहतसे तयांवरुनियां गङ्गा महापावना;
देवांची दिसते तनूंत तसल्या मूर्ती मनोमोहना

वीर्याच्या अति सूक्ष्म बिन्दुंत मनुष्यांची जशी निर्मिति
अैशा रक्तकणांतुनी नव हुतात्म्यांची तशी निश्चिति;
मृत्यू मारियला पुरा धृतिबळें रक्ता अशा शिम्पुनी
क्लेशांचें विष प्राशितां, अमर तो झाला सुधेवांचुनी

शैथिल्या हरवीत, मानवगणां आशा नव्या द्यावया
स्फूर्तीची नित ज्योत अेक जळते शोषून तैलासि या
सत्त्वांचें अमरत्व सिद्ध करण्या अस्तित्व या बिंदुंना
सौख्याचा पथ दाविण्यासि अथवा या ठेविलेल्या खुणा

# ३५ सुभाषचन्द्रांस....

## [ चालः- कवि यशवन्तांच्या ‘ माहुतास ’ या कवितेसारखी ]

( देशगौरव सुभाषचन्द्र बोस परदेशांतून परत येऊन मातृभूमीला पाय लावतात न लावतात तोंच अेकदां साम्राज्यशाही सरकारनें त्यांस अटक करून कुर्सियाँङ्गला डाम्बून ठेवलें. त्या प्रसङ्गानें ही कविता स्फुरली. ती अद्यावत् करण्यासाठीं एकदोन शब्दांत फरक करून तिचें भाषान्तर मित्रवर्य श्री. स्वरूप व्यास यांनीं हिन्दुस्थानींत केलें आहे—कवि)

रे सुभाष, नित शुभाश, घेअि नम्र वन्दना ॥ धृ० ॥

कण्ठि हे न शब्द रे
चक्षुंतील हे झरे
टपटप गळतात अिथे भरतभूमिनन्दना ॥ १ ॥

देश दास्यकर्दमांत,
बघुनि दीर्ण तूं हृदांत
बैसलासि हांकण्यासि राष्ट्रकार्यस्यन्दना ॥ २ ॥

सौख्यभुवन सोडुनी
बन्दिवास जोडुनी
राहसी हुताशनांत देत देह अिन्धना ॥ ३ ॥

दूर नेति अन्तरांत [1]
जवळ म्हणुनि अन्तरांत [2]
येसि अधिक; भोगितोसि हृदिय स्वाभिनन्दना ॥ ४ ॥

तुज न कष्ट कष्टवीत
राष्ट्राला ते मनांत
व्यथित करित योजितील तोडण्यासि बन्धनां ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 6069
ग्रं. क्र.
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

1. In distance 2. हृदयांत, अन्तःकरणांत.

[ जाति–नववधू ]

हो आत्मवञ्चना पुरे करा;
अन् उघडुनि डोळे पहा जरा ।। घ्रु० ।।

राष्ट्रैक्याचें भवन भङ्गलें
संतानांना रान मोकळें
कोटि कोटि भयभीत स्त्रीमुलें
अणि तोरण तुमच्या चढे घरा ।। १ ।।

तुमचा राष्ट्रध्वज अवमानुन
असङ्ख्य दलितांना लाथाडुन
घरभदी ध्वज पक्का रोवुन
नव आक्रमणा[1] हो सज्ज पुरा ।। २ ।।

लपले धनधान्यांचे सांठे
गरिबांचा जिव नेत्रीं दाटे
दुग्ध न बाळां मिळे पहांटे
वाटतोसि पेढे निलाजरा ।। ३ ।।

अर्धनग्नता राज्य जिथे करि
ना थण्डी ना लज्जा सांवरि

तेथं तुमचे ध्वज जरतारी
सुखवितील का लज्जेंत नरां ? ॥ ४ ॥

निष्पापांचीं हजारों घरें
जळुनी धूमें भरति अम्बरें[2]
आगीच्या डोम्बांत जग गिरे
तूं अन्ध रोषणाऑंत खरा ! ॥ ५ ॥

बेकारीवरी, दुष्काळावरि,
बेकीवरि, गोळ्यांसुऱ्यांवरी
बसुनि यमाची येते स्वारी
तयासि का हा हारतुरा ? ॥ ६ ॥

या राष्ट्राचे सच्चे पाअिक
अुपेक्षेंत दारिद्र्यीं स्थायिक
मिरविण्यास पण अिथले नायक
स्वार्थी आले भराभरा ॥ ७ ।

सत्य तुम्हां देतसे अिशारा
पापकाल हा ठाकला पुरा
कसा कम्बरा सज्ज व्हा त्वरा
वारिण्या परिस्थिति भयङ्करा ॥ ८ ॥

रचनाकाल- १५ ऑगस्ट १९४७

---

१ दुर्दैवानें कवीचें भाकीत खरें ठरून पाकिस्ताननें काश्मीरवर पुढें लवकरच आक्रमण केलें. २ लाहोर अित्यादि ठिकाणीं पाकिस्तान्यांनीं केलेल्या जाळपोळीला अुद्देशून हें वर्णन आहे.

## ३७ तुलाच....

[ जाति-लीलारति ]

कल्पना नि अुपमा सार्‍या झाल्या जुन्या !
तें वर्णन कधि का बरोबरी दे जिण्या ?

सान्निध्यीं तुझिया क्षण जो लाभे मला
भूतकालि भावी कालि तया ना तुला

तुजसम्बन्धीं गावया यथार्थी गिरा
मूकता अल्पपर्याय ठरविते बरा

अन् मनश्चक्षुंचा यत्न पाहण्या तुला
वस्तुच्या अभावीं भासांतिल वांकुल्या

पण अिथे कुठेसा तुझा अुमटला ठसा !!
अन्धार अुजळण्या भानूचा कवडसा !

छे ! मी न तुजपुढें सामान्यहि आरसा
श्रीकृष्ण न मावे पार्थचक्षुंमधि जसा.

श्रह्मार्थ तोकडी वेदर्षींची अुडी
अुरतोस वाहुनी दुथडी माझी कुडी

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

कालाची प्रतिकूल या तुजसवें चाले लढाअी किती !
ते पूर्वग्रह भ्रष्टवीत असती येथें जनांची मति
सत्तेनें मद घेत मातत अिथे वारे विरोधी अति
हातांतील तुझ्या ध्वजा ढळविणें नाहीं कुणाची क्षिति !

लोखण्डी दृढ पिन्जऱ्यांत परके राष्ट्रासि या कोण्डिती
त्याला त्यांतुनि मोचिण्यासि झटतां गात्रें तुझीं लोम्बती
श्रद्धेचा हटरोग राष्ट्रपुरुषा रूढीमध्यें गुङगवी
तेव्हां अग्र नरावलींत दिससी बुद्धीस जी जागवी

मानव्यास [1]पुरी [2]पुरी यमपुरी ज्या अन्दमानांतली
तेथें निर्मिसि शारदा; कविकुलीं सम्पन्नता वाढली
त्वद्यत्नें द्रवले पुराणयुगिचे पाषाणही कोंकणीं[3]
गीता तूं लिहिलीस त्यांत पथदा; कर्मे तुझी लेखणी !

बाल्यापासुनि त्वच्चरित्रशशिनें अैशी प्रभा दाविली
प्रज्ञा वा प्रतिभा वसे सुचरितीं ती जीवरी लोभली

१. पुरतेपणीं २. गाडते, पुरते ३. वीर सावरकरांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील कल्पनातीत प्रतिकूल परिस्थितींत केलेल्या अेका तपाच्या बुद्धिवादाधिष्ठित कार्याचा हा अुल्लेख आहे.

विद्येला तव लाभलें अतुल तें वक्तृत्वची पैन्जण
साधोनी पुरुषार्थ सर्व अुरसी मोक्षासि आकर्षण

तेजापासुनि भीत जन्तु लपतां तेजांत ना न्यून्यता
पाण्यासन्निध जैं तृषार्त जन तैं पाण्या न ये क्षुद्रता
भ्रान्तीनें अनुयायि मार्ग मुकतां अेकान्त सन्नायका
कीं अेकान्त विपत्तियुक्त जलिच्या स्वस्थान दे दीपका

नाना सत्कृतिनीं जडे तव स्वयंसिद्धा तुझी थोरवो
जी गायास्तव अन्धभक्तच नको किंवा पगारी कवि
सत्तत्वें ठसुनी प्रचारित तुझीं आचार जेव्हां जनीं
भाग्याचा अुदयास येअिल अिथे आदित्य तेव्हां क्षणीं

## ३९ आवाहन

नों. ४४४२० २०२५/३

( जाति–नववधू )

द्या अशी मला कविता रचुनी
जी चैतन्याची नित्य खनी ॥ धृ० ॥

पञ्चखण्ड पसरे मानवता
अुत्कर्ष तिचा अुज्ज्वल कविता
ठरेल मानववंशि संहिता
सञ्जीवनी युगांयुगांतुनी ॥ १ ॥

मातृपदांतिल सृष्टिशीलता
पितृपदींची रक्षणरतता
बाल्यांतील स्वच्छन्दसहजता
जी भावदुग्ध पी यांमधुनी ॥ २ ॥

संसाराच्या चढत्या ग्रीष्मीं
वासन्तिक आशाद्रुम निर्मी
हौतात्म्याच्या प्रभवीं होमीं
पार्श्वगीत घुमवी धीरस्वनीं ॥ ३ ॥

ध्वज राज्यांचे, फड वादांचे
कालविपर्यय स्वार्थान्धांचे

लाञ्छित करित न वाञ्छित जीचें
सरितांना सम साऱ्या जमिनी ॥ ४ ॥

जिच्या प्रभावीं नुरे अमङ्गल
हरदिन फुलतो दिव्यें पलपल
सहा रिपूंचें तुटतें जङ्गल
नित तेज वाहतें तमांतुनी ॥ ५ ॥

अरुण, कुमुद, ऋतु, अुन्मेषांचें,
आरोग्याच्या चिरकान्तीचें,
करितां वर्णन अंगिं जियेचें
सुषमेला व्याख्या मिळे क्षणीं ॥ ६ ॥

चित्रकला मुकली जी वाणी
सूर अिथें स्थिर भाव बनोनी
आत्मा पुरुनी उरे नर्तनीं
अवतीर्ण सर्व हीं ज्या चरणीं ॥ ७ ॥

अिथे सद्गुणा अवगुण ग्रासित
साधुवेषिं ये असत्य हांसत
शौर्यरूप घे क्रौर्य अलज्जित
बदलिते काळ हा लङ्घोनी ॥ ८ ॥

विश्वीं या सर्वत्र भिन्नता
थकवुनि चित्ता आणि खिन्नता
तिथेंच पाही पूर्ण अेकता
जी तत्त्वद्न्यानाची भगिनी ॥ ९ ॥

भूतभविष्यीं ओंवी दोरा
जिला दिशांची कोण्डि न कारा
देअि भावना शास्त्राचारा
फुलवील मळे मरुभूमितुनी ॥ १० ॥

## ४० घे रे बुध रसिका

घे रे बुध रसिका ॥ धृ० ॥

आणी पोहे सुदाम
भक्ती घे ओशनाम
प्रीती हो पूर्णकाम
लाभे कण्ठ पिका ॥ १ ॥

चन्दन गन्धांत झरत
ज्योति सुतेजांत सरत
सेवेमधि सूर सुरत
नाहीं कुणि परका ॥ २ ॥

मृत्तिकेंत सुमन फुलत
अिद्रधनू किरणिं खुलत
विश्वीं चिर आयु झुलत
भारी भव हलका ॥ ३ ॥

(आवास ता.–अलिबाग येथील माझे सहकारी शिक्षक बंधु व सङ्गीताचे व्यासङ्गी श्री. हरिभाअु दामले यांच्या अिच्छेवरून ही कविता गाण्यासाठीं त्यांना करून दिली होती. ते ती 'भूप' रागांत म्हणत. ताल–दादरा. ती 'माण्ड' रागांतही चाङ्गली लागते असें एका माहितगारानें साङ्गितलें. ती कार्यक्रमाच्या आरम्भीं म्हणण्यास अुचित अशीच रचिली आहे. –कवि)

## २१ हें जीवन....

### [ जाति-लीलारति ]

हें जीवन असलें मला नको बेगडी !
गुणवेल वाढण्या जागा ही तोकडी
गुदमरतो येथें विवेक; सुख पारखें
जन जनास फसवी, मनास मन सारखें १

तनु विमल खुरटते बाह्यवेषसाधनीं
गणगोत अडकती क्षुद्र अुथळ वर्तनीं
अद्न्यान लोटिलें जयां रिपूंच्या करीं
ते मिरमनें पिन्जतात निन्दाशरीं २

पाजूनि बान्धवां खुशामतीची सुरा
हे गळे कापिती; करिं स्वार्थाचा सुरा !
मोहवी सत्तांची भागेदारी जयां
ते महाजन तरी प्राप्त सोडणें तयां ३

नित पैन्जण येथें लछमीचा खुळखुळे
माणुसकी विकिली: बाराङ्गण मोकळें
चुरडला पदतलीं शिवसत्याचे कळे
मी जातों अिथुनी; जग माझें वेगळें ४

थिल्लरता नाचे गाम्भीर्याच्या क्षयीं
द्रौपदीच झटते दु:शासन–अनुनयीं
धारणा सुटतसे संयम सारा सरे
आचार धरा जी धरा तीच हावरे ५

ओढवुनी अपुली दलितांवर नायकी
स्वोद्‌धार साधिती कसलेले नाटकी
जगतीस दाविती पाठ नि नालायकी
अन्धांची माला अध्यात्मा घे मुखीं ६

सद्‌वचनसुमें दुष्कृतित अिये करपती
निष्पाप बालकें सत्तेशां अर्पिती
पैशाच्यापुढतीं प्रतिभा हो पाङगळी !
भासते न्यायदेवता स्वतः आन्धळी ! ७

— — —

जगण्यासि मला हा लहानसा कोंपरा
वाहील येथुनी मानव्याचा झरा
पेटवीन येथें मम प्राणांचा दिवा
ज्वलनांत सार्थ त्या मम आशांचा थवा ८

येतील शिशुगण या माझ्या गोकुळीं
हें जग सामावे सर्व जयांच्या कुळीं
वेंचितील क्षण क्षण कार्यांच्या कारणीं
नित हसेल येथें वर्षा ग्रामांतुनी ९

मा. स. बापट नासिक

अपमानित, पीडित जातीधर्मांमुळें
वा शस्त्रांचें नख नाहीं ज्यां लाभलें
ते अपङ्ग घेतिल अजिङ्क्य येथें बळें
आगळा ओघ अितिहासा येथें मिळे ! १०

सम्पत्ती रुसली अुगीच ज्यांच्यावरी
कीं न्यायच अुलटे येथे नीतीवरी
घेतील अिथे ते अुबाऱ्यांत आसरा
जग जिङ्कायाची जातिल शिकुनी तऱ्हा ! ११

मिटलेले डोळे अद्न्यानाच्यामुळें
अुघडतील तेजें प्रद्न्याप्रतिभाबळें
होअील स्वत:चा येथें जो तो गुरु
विश्वांत न मावे मानवतेचा तरु १२

— — —

मज देअुं नका कुणि स्तुतिचीं सम्मोहनें
त्या टाळ्या : लोकेषणेंतलीं बन्धनें
नित परीक्षावया निजहृदिंचीं स्पन्दनें
शान्तता हवी मज, अिमानदारी जिणें १३

— — —

मी दमल्यावरि मज अुचलिल मृत्यूसखा
विस्मृतींत फुङ्किल काळहि माझी रखा
जन्मेन कदाचित पुनः मानवांतुनी
नवरूपीं अुत्स्फूर्तांच्या कृत्यांतुनी १४

रचनाकाल--डिसेम्बर ६२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 1069

REFBK-0008081
REFBK-0008081
ग्रं. क्र. 609
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

किंमत दोन रुपये

प्रमुख विक्रेते—
कॉण्टिनेण्टल् प्रकाशन, पुणें २.
बलवन्त पुस्तक भाण्डार, मुंबई ४.

मुखपृष्ठ—श्री. विनायकराव अंगारी

★